❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २२८ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

# दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# शिवसेनेवर निकाल देण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नव्हताच

## ठाकरेंच्या वकिलांचा दावा

■ मुंबई (दै. संध्या)




शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावरून ठाकरे आणि शिंदे गटात सुरू असलेल्या कायदेशीर लढाईची सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचे ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी सुनावणीदरम्यान निवडणूक आयोगाच्या निर्णयावर आणि अधिकारक्षेत्रावर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. विधिमंडळ पक्षातील फूट ही राजकीय पक्षातील फूट मानता येते का, 2018 ची पक्षघटना अमान्य करण्याचा आयोगाला अधिकार होता का, तसेच 'मुख्य नेता' हे पद शिंदे यांनी कोणत्या आधारे स्वीकारले, असे अनेक मुद्दे सिब्बल यांनी न्यायालयासमोर मांडले.

कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादाचा मुख्य आधार हाच होता की, एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर फूट ही विधिमंडळ गटात पडली होती, राजकीय पक्षात नाही. त्यामुळे विधिमंडळ पक्षातील फूट म्हणजेच संपूर्ण शिवसेना पक्षात फूट पडली, असा निष्कर्ष निवडणूक आयोगाने काढणे चुकीचे असल्याचा दावा त्यांनी केला.

विधिमंडळ पक्षाची स्वतंत्र बैठक घेणे किंवा विधिमंडळ शाखेशी संबंधित पत्रव्यवहार करणे याचा अर्थ राजकीय पक्षात फूट पडली असा होत नाही, असे सिब्बल यांनी स्पष्ट केले. 21 जूनच्या पत्राचा संबंध केवळ विधिमंडळ शाखेशी होता, असा त्यांचा युक्तिवाद होता.

सिब्बल यांच्या मते, परिच्छेद 15 अंतर्गत निवडणूक आयोगाचे अधिकार तेव्हाच वापरता येतात जेव्हा राजकीय पक्षात फूट पडते आणि दोन प्रतिस्पर्धी गट निर्माण होतात. केवळ विधिमंडळ पक्षात फूट पडल्याचे दाखवून आयोगाला हा अधिकार वापरता येणार नाही.

सिब्बल यांनी आयोगाच्या भूमिकेतील विरोधाभास न्यायालयासमोर मांडला. जर तीन पत्रव्यवहारांवरून पक्षात फूट पडल्याचे आयोग मानत असेल, तर त्याचा आधार चुकीचा आहे आणि फूट पडली नाही असे मानले तर परिच्छेद 15 अंतर्गत आयोगाला अधिकारक्षेत्रच मिळत नाही, असा त्यांचा युक्तिवाद होता. सिब्बल यांनी राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यांच्यातील फरकावर भर दिला. त्यांच्या मते, विधिमंडळातील आमदारांची संख्या किंवा त्यांच्यातील फूट यावरून संपूर्ण राजकीय पक्षाची मालकी ठरवता येणार नाही. चिन्ह आदेशात विधिमंडळ पक्षाचा स्वतंत्र उल्लेख नाही, असा मुद्दा सिब्बल यांनी मांडला. त्यामुळे शिवसेनेचे पक्षचिन्ह ठरवताना केवळ विधिमंडळ पक्षातील संख्याबळाचा आधार घेणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले. सिब्बल यांच्या मते, फूट ही मूळ राजकीय पक्षात पडली पाहिजे. त्यानंतरच पक्षातील प्रतिस्पर्धी गटांचा प्रश्न निर्माण होतो. केवळ आमदारांचा वेगळा गट निर्माण झाला म्हणून तो संपूर्ण राजकीय पक्षाचा प्रतिस्पर्धी गट ठरत नाही. अपात्रतेच्या कारवाईच्या संदर्भात समोरचा गट एक-तृतीयांश किंवा दोन-तृतीयांश सदस्यांचा दावा करू शकतो, असे सिब्बल यांनी सांगितले. राणा प्रकरणाच्या परिच्छेद 38 चा संदर्भ देत एक-तृतीयांश आमदारांनी स्वतंत्र गट स्थापन केला आहे, हे दाखवणे पुरेसे ठरू शकते, असा युक्तिवाद त्यांनी केला.

शिंदे गटाला आमदार आणि मंत्री होण्यासाठी ज्या पक्षघटनेचा आधार मिळाला, त्याच 2018 च्या पक्षघटनेवर नंतर प्रश्न उपस्थित करता येणार नाही, असा मुद्दा सिब्बल यांनी मांडला. 2018 च्या घटनेला शिंदेंच्या गटाने विरोध केला. पण त्याच घटनेच्या आधारे ते आमदार आणि मंत्री झाले, मग ती गोष्टही लोकशाहीविरोधी असल्याचं समजायचं का? असा सवाल सिब्बल यांनी विचारला.

शिंदे गटाने 2018 ची शिवसेना पक्षघटना लोकशाहीविरोधी असल्याची भूमिका घेतल्याचे सिब्बल यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणले. जर ती घटना लोकशाहीविरोधी होती, तर त्याच घटनेच्या आधारे झालेल्या नियुक्त्या आणि घेतलेले लाभही लोकशाहीविरोधी ठरतील, असा प्रतिवाद त्यांनी केला.

सिब्बल यांच्या युक्तिवादानुसार, पक्षघटना लोकशाहीविरोधी असल्याचा आयोगाचा निष्कर्ष असेल तर संबंधित पक्षाला नोंदणीबाबत नोटीस देण्याचा विषय निर्माण होतो. पण त्यातून दुसऱ्या गटाला पक्षाचे निवडणूक चिन्ह देण्याचा अधिकार निर्माण होत नाही, असा त्यांचा दावा होता. पक्षामध्ये पदाधिकाऱ्यांची नियुक्ती कशी करायची, संघटनात्मक रचना कशी असावी, कोणत्या पदाची निवडणूक घ्यायची, याबाबत राजकीय पक्षाला स्वतःची रचना ठरवण्याचा अधिकार असावा, असे सिब्बल यांनी सांगितले. सिब्बल यांनी सांगितले की, निवडणूक आयोगाच्या संबंधित मार्गदर्शक सूचना 2010 मध्ये लागू झाल्या आणि त्या पक्षांच्या नोंदणीशी संबंधित होत्या. 2010 पूर्वी नोंदणीकृत पक्षांना त्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नव्हती, असा त्यांचा युक्तिवाद होता. सिब्बल यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणले की, पक्षघटनेबाबत कोणत्याही टप्प्यावर संबंधितांना नोटीस देण्यात आली नव्हती. त्यामुळे नंतर त्याच घटनेच्या आधारे आयोगाने घेतलेल्या भूमिकेवर त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

## संध्या प्रहार




## थोडक्यात...

### हायवेवर थांबलेल्या तरुणीला बंगल्यावर नेलं

पालघर : दैनिक संध्या

राज्यातील महिलांवरील, तरुणींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटना काही केल्या कमी होताना दिसत नाहीत. एकीकडे सरकार महिलांवरील अत्याचाराच्या बाबती गंभीर असून पोलिसांनाही तातडीने कडक कारवाईचे निर्देश दिले आहेत. मात्र, महिलांवरील अत्याचाराच्या घटना कमी होताना दिसत नाहीत. आता, सामूहिक लैंगिक अत्याचाराच्या घटनेनं पालघर जिल्ह्यातील तलासरी हादरलं आहे. आपल्या मित्रासोबत दुचाकीवरुन फिरण्यासाठी गेलेल्या तरुणीवर सहा जणांकडून सामूहिक लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या संतापजनक घटनेनं पालघर जिल्हा हादरला आहे. पालघरच्या तलासरी पोलीस ठाणे हद्दीतील ही घटना असून पीडित मुलीच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल केला आहे. मित्रासोबत महामार्गावर उभं असताना दोन बाईकवरून आलेल्या सहा जणांनी एका बंद पडलेल्या डाक बंगल्यात नेत 19 वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याचं तक्रारीत म्हटलं आहे. याप्रकरणी, तलासरी पोलीस ठाण्यात सहा आरोपींविरोधात गुन्हा दाखल असून तीन आरोपींना अवघ्या काही तासातच अटक करण्यात आली आहे.

### उरलीसुरली काँग्रेसही संपवू नका : मनोज जरागे

पालघर : दैनिक संध्या

मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण चांगलेच पेटले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या टीकेला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी अत्यंत तिखट शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. "राहुल गांधींनी तुम्हाला माझ्यावर टीका करायला सांगितलेय का?" असा थेट सवाल करत जरांगे यांनी वडेट्टीवारांवर जोरदार पलटवार केला आहे. विजय वडेट्टीवार यांच्या टीकेचा समाचार घेताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, "अरे तुम्ही सगळे खड्ड्यात गेले ना, नीट वागा ना. काँग्रेसचे दोन-चार जणांमुळे थोडेफार बरे चालले आहे. अमित देशमुख साहेब, बाळासाहेब थोरात साहेब, चव्हाण साहेब, हर्षवर्धन सपकाळ साहेब आणि नाना पटोले साहेब यांच्यामुळे बरं चाललं आहे. तुम्ही कशाला हा सगळा खेळ विस्कटता?," असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ते पुढे म्हणाले, "त्या राहुल गांधींनी हेच सांगितलं आहे का की मराठ्यांच्या विरोधात बोला. काँग्रेस आता बोटावर मोजण्याइतकी सुद्धा राहिली नाही. काँग्रेसला कशाला खड्ड्यात घालत आहात. नीट राहा ना. तुम्ही कितीही बोलला तरी मी आरक्षण घेणारच आहे.

### चौथी, सातवीच्या गुणवत्ता यादीत अव्वल

पुणे : दैनिक संध्या

इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथील जिल्हा परिषद शाळेचा यशवर्धन थोरात याने ९८.६६ टक्के गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. तर सातवीच्या परीक्षेत वसेवाडी (ता. शिरूर) येथील जिल्हा परिषद शाळेची प्रदिशा गाडे हिने ९६ टक्के गुणांसह राज्यात प्रथम क्रमांक मिळविला. यासह पुणे जिल्ह्याने चौथी आणि सातवीच्या राज्य गुणवत्तायादीत महाराष्ट्रात अव्वल स्थान कायम राखले असून, गुणवत्तायादीतील ९२ विद्यार्थ्यांपैकी ४८ विद्यार्थी सातवीचे आणि ४४ विद्यार्थी चौथीचे आहेत.

# कँटिनमधील पदार्थांमधील हाय शुगर, फॅट अन् सॉल्टसाठी मर्यादा निश्चित

■ नवी दिल्ली (दै. संध्या)




शाळेच्या कॅन्टीनमध्ये रोज मिळणारे समोसे, चिप्स, बिस्कीट किंवा कोल्ड ड्रिंक्स विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी किती घातक आहेत? याचे उत्तर आता केवळ अंदाजावर नाही, तर थेट आकडेवारीच्या आधारे मिळणार आहे. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने शालेय विद्यार्थ्यांच्या आहाराबाबत एका नव्या नियमावलीचा मसुदा जारी केला आहे. यामध्ये पहिल्यांदाच एखाद्या पदार्थात नेमकी किती साखर, चरबी किंवा मीठ असल्यास त्याला हाय शुगर, हाय फॅट किंवा हाय सॉल्ट मानायचे, याचे स्पष्ट निकष निश्चित करण्यात आले आहेत. एफएसएसएआयच्या नव्या प्रस्तावानुसार, पदार्थांचे दोन मुख्य प्रकारांमध्ये वर्गीकरण करून मर्यादा ठरवण्यात आली आहे. हाय शुगर 3 ग्रॅमपेक्षा जास्त अतिरिक्त साखर असल्यास. हाय फॅट (High Fat) : 4.2 ग्रॅमपेक्षा जास्त अतिरिक्त फॅट असल्यास. हाय सॉल्ट (High Salt) : 0.625 ग्रॅमपेक्षा जास्त मीठ असल्यास. 2. द्रव पदार्थ किंवा पेये (Drinks Liquids - प्रति 100 मिली) : हाय शुगर : 2 ग्रॅमपेक्षा जास्त अतिरिक्त साखर. हाय फॅट : 1.5 ग्रॅमपेक्षा जास्त फॅट. हाय सॉल्ट : 0.175 ग्रॅमपेक्षा जास्त मीठ. हे निकष भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या 2024 च्या 'डायटरी गाईडलाईन्स' लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहेत. 'वर्ल्ड ओबेसिटी अॅटलास 2026' च्या अहवालानुसार, भारतात सध्या सुमारे 4.1 कोटी बालके जास्त वजन किंवा लठ्ठपणाच्या समस्येने ग्रस्त आहेत. मुलांमधील वाढता लठ्ठपणा आणि त्यामुळे निर्माण होणारे आजार रोखण्यासाठी शाळांच्या आत आणि परिसराच्या 50 मीटरच्या व्याप्तीत जंक फूडची विक्री, मोफत वाटप आणि जाहिरातींवर बंदी घालण्याचे धोरण राबवले जात आहे. महाराष्ट्रातील सुमारे 1.08 लाख शाळांमध्ये गेल्या महिन्यापासूनच अशा आरोग्याला हानीकारक पदार्थांच्या विक्रीवर आणि जाहिरातींवर बंदी घालण्यात आली आहे. तसेच शाळांच्या कॅन्टीनसाठी एफएसएसएआयचे परवाना प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले आहे.

# सर्पदंशाने तीन मुलींचा मृत्यू, मंत्रालयात पडसाद

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अधिकाऱ्याच्या निलंबनाचे आदेश

■ मुंबई (दै. संध्या)



राज्याचे मुख्यमंत्री ज्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत, त्या गडचिरोलीच्या धानोरा तालुक्यातील जपतलाई निवासी आश्रम शाळेत सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, आश्रमशाळेत झोपलेल्या 6 विद्यार्थीनींना एकाचवेळी सर्पदंश झाला. त्यामध्ये, तीन विद्यार्थीनींचा मृत्यू झाला असून तीन विद्यार्थिनींना जखमी असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या दुर्दैवी आणि संतापजनक घटनेचे पडसाद आज मंत्रालयात उमटल्याचं दिसून आलं. आदिवासी मंत्री महोदयांनी याबाबत, संबंधित आश्रमशाळेच्या संस्थापकांविरुद्ध मंत्रिमंडळ बैठकीत संताप व्यक्त केला. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आश्रमशाळेची पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्यास निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. गडचिरोली आश्रमशाळेतील धक्कादायक घटनेचे पडसाद आज मंत्रालयात पाहायला मिळाले. आश्रमशाळेतील तीन मुलींचा मृत्यू झाल्याची बाब गंभीर असल्याचे सांगत, आदिवासीमंत्र्यांनी संताप व्यक्त केला. काँग्रेसचे मारोतराव कोवासे यांच्यासारखे 3 वेळा आमदार, एकदा खासदार राहिलेले नेते आश्रमशाळा असे चालवत असतील आणि लहान मुलींच्या सुरक्षेशी खेळत असतील, तर ते कसे माफ करणार? असा सवालच आदिवासी मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत विचारला. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या घटनेनंतर कारवाईचे आदेश दिले आहेत.

संबंधित आश्रमशाळेत शिक्षक नाही, वॉर्डन नाही, तर शासकीय अनुदान घेत असतानाही सुविधा देत नाही. त्यामुळे, या आश्रमशाळेची ज्या अधिकाऱ्याने तपासणी केली आणि अहवाल दिला, त्याला निलंबित करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिले. रस्त्यावरच्या आश्रमशाळांची केवळ पाहणी करू नका, अंतर्गत भागातील आश्रमशाळांची सुद्धा नियमित तपासणी करा. तसेच, संबंधित आश्रमशाळेचा परवाना कायमस्वरूपी रद्द करा, असेही आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. मुख्य सचिवांनी एक बैठक घेऊन सर्वकष तपासणीची यंत्रणा उभी करावी. सर्व विभागांना त्यात समाविष्ट करा, असेही सूचवले.

आदिवासी आश्रम शाळा आहे, त्यात स्पेशल ऑडिट करावे, इंटिरियर असलेल्या आश्रम शाळांची देखील तपासणी करावी, अशा सूचना मुख्यमंत्री यांनी दिल्या आहेत. तसेच, कडक कारवाईचेही बजावले आहे. आश्रम शाळेचे संचालक आणि अधिकाऱ्यांमुळे जीव जाऊ नये यासाठी सूचना दिल्या आहेत. ऑडिटमध्ये सापडले तर सोडायचे नाहीत, गुन्हे दाखल करण्याच्याही सूचना दिल्या आहेत.

# बारामतीत २३ वर्षीय युवतीचा संशयास्पद मृत्यू



■ बारामती (दै. संध्या)

बारामती शहरात २३ वर्षीय युवतीचा संशयास्पद मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी युवतीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून अथर्व राजेंद्र मेहन (वय २७) याच्याविरुद्ध बारामती शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत्यूपूर्वी काही तास अगोदर युवतीने आईला फोन करून, अथर्व तिला गोळी खाण्यास देणार असल्याचे सांगितल्याचा दावा फिर्यादीत करण्यात आला आहे. दरम्यान, युवतीच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलिसांकडून वैद्यकीय, रासायनिक, डिजिटल आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे. पोलिसांकडे दाखल

## तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

झालेल्या फिर्यादीनुसार, घटनेच्या सुमारे १५ ते २० दिवसांपूर्वी युवती नेहमीपेक्षा शांत व गप्प राहत असल्याचे तिच्या आईच्या लक्षात आले होते. याबाबत आईने तिच्या मैत्रिणीकडे विचारणा केली असता, अथर्व हा युवतीवर वारंवार शारीरिक संबंध ठेवण्यासाठी आग्रह करीत असल्याचे तसेच तिला काही गोळ्या खाण्यास देत असल्याचे मैत्रिणीने सांगितल्याचा उल्लेख फिर्यादीत आहे.

दरम्यान, ६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी सुमारे १२.३० वाजता अथर्व कार घेऊन युवतीला एमबीए प्रवेशाच्या कामासाठी टी.सी. कॉलेज, बारामती येथे घेऊन गेला होता. त्याच दिवशी दुपारी सुमारे ४ वाजता युवतीने आईला संदेश पाठवून प्रवेश शुल्काबाबत माहिती दिली. तसेच ती अथर्वसोबत त्याच्या आई व मावशीला सोडण्यासाठी जात असल्याचे सांगितले. त्यानंतर आईने व्हिडिओ कॉल केला असता युवती अथर्वसोबत वाहनात असल्याचे दिसून आले. त्यावेळी आईने तिला लवकर घरी परतण्यास सांगितले.

सायंकाळी सुमारे ७ वाजता आईने युवतीला दोन वेळा फोन केला. मात्र, तिने फोन न उचलल्याने आईने अथर्वच्या मोबाईलवर संपर्क साधला. त्यावेळी आईचे युवतीशी बोलणे झाले. या संभाषणात अथर्व तिला त्याच्या घरी घेऊन जाणार असून, त्याला तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवायचे आहेत. तसेच तो तिला गोळी खाण्यास देणार असल्याचे युवतीने सांगितल्याचा दावा आईने फिर्यादीत केला आहे. ही माहिती समजल्यानंतर आईने मुलीला अथर्वच्या घरी जाऊ नये आणि तातडीने घरी परतावे, असे सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

यानंतर रात्री युवतीची प्रकृती अचानक बिघडल्याचे सांगण्यात आले. तिला बारामतीतील विविध रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर युवतीच्या आईने अथर्व राजेंद्र मेहन याच्यावर गंभीर संशय व्यक्त करून पोलिसांत तक्रार दाखल केली. फिर्यादीतील माहितीनुसार, युवतीने बी.एससी. अॅग्रीचे शिक्षण पूर्ण केले होते. त्यानंतर ऑक्टोबर २०२५ पासून ती एमपीएससी परीक्षेच्या तयारीसाठी पुण्यात क्लास करीत होती. डिसेंबर २०२५ मध्ये तिच्या मैत्रिणीकडून आईला युवतीचे अथर्वसोबत प्रेमसंबंध असल्याची माहिती मिळाली होती.

३० डिसेंबर २०२५ रोजी आई आणि तिचा भाऊ पुण्यात जाऊन युवतीला बारामती येथे घेऊन आले. त्यावेळी युवतीने अथर्वसोबत प्रेमसंबंध असल्याचे आणि त्याच्यासोबत विवाह करण्याची इच्छा असल्याचे आईला सांगितल्याचा उल्लेख फिर्यादीत आहे. त्यानंतर दोन्ही कुटुंबीयांमध्ये विवाहाबाबत चर्चा झाली. १२ एप्रिल २०२६ रोजी युवतीच्या कुटुंबीयांनी अथर्वच्या बारामती येथील घरी जाऊन चर्चा केली होती. दोन्ही कुटुंबीयांच्या संमतीने त्यांचा विवाह करण्याचे ठरले होते. त्यानंतर दोघेही एकमेकांना भेटत तसेच फोनवर नियमित संपर्कात होते.

## मृत्यूचे नेमके कारण शोधण्याचे आव्हान

या प्रकरणात युवतीला प्रत्यक्षात कोणती गोळी, औषध किंवा अन्य पदार्थ देण्यात आला होता का, दिला असल्यास तो कोणता होता, त्याचे सेवन झाले का, त्याचा तिच्या प्रकृतीवर काय परिणाम झाला आणि त्याचा मृत्यूशी काही संबंध आहे का, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# व्हिडिओ करत संपवली जीवनयात्रा

■ बुलढाणा (दै. संध्या)

बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. करमोडा ग्रामपंचायतीचे विद्यमान लोकनियुक्त सरपंच दीपक प्रकाश उगले यांनी आपली जीवनयात्रा संपवल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे संग्रामपूर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दीपक उगले यांनी स्वतःच्या शेतात हे टोकाचे पाऊल उचलले. आपले जीवन संपवण्यापूर्वी त्यांनी एक व्हिडीओ तयार करून तो समाजमाध्यमांवर प्रसारित केल्याचे सांगण्यात येत आहे. या व्हिडीओमध्ये त्यांनी 'राजकीय विरोधकांच्या धमक्यांना व त्रासाला कंटाळून मी माझं जीवन संपवत आहे', अशा आशयाचे वक्तव्य केल्याची माहिती आहे. या व्हिडीओमुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे. दीपक उगले यांनी नेमक्या कोणत्या व्यक्तींकडून धमक्या मिळाल्या होत्या, त्यांना कोणत्या प्रकारचा त्रास दिला जात होता आणि या घटनेमागील नेमके कारण काय, याचा तपास आता पोलिसांकडून केला जाणार आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करत पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. दीपक उगले यांनी टोकाचे पाऊल उचलण्यापूर्वीचा व्हिडीओ आणि त्यामध्ये करण्यात आलेले आरोप हे तपासाचा महत्त्वाचा भाग ठरण्याची शक्यता आहे. दीपक प्रकाश उगले हे करमोडा ग्रामपंचायतीचे विद्यमान लोकनियुक्त सरपंच होते. त्यामुळे त्यांच्या अचानक झालेल्या मृत्यूची बातमी समोर येताच ग्रामस्थांसह परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# संपादकीय

## अवाढव्य होर्डिंग्ज

अलीकडे कुठल्याही गावात जाण्याचा योग आला की, गाव दिसण्याआधी दिसतात अवाढव्य फ्लेक्स होर्डिंग्ज आणि त्यावर 'कार्यकर्ता' नामक प्रजातीच्या इसमांची पोस्टाच्या तिकिटाएवढ्या बारक्याबारक्या आकारातली असंख्य चमत्कारिक तोंडे. सडकेवरून गावात जाणा-या निर्मनुष्य फाट्यापासून गावाच्या वेशीत, चौकात, शाळेसमोर, पाण्याच्या टाकीजवळ आणि रस्त्या-रस्त्यांच्या कडेला- सगळीकडे झालेला फ्लेक्सचा सुळसुळाट. एसटी स्टँडसमोरची दाटीवाटी. एस्टीतून जात-येत असलेल्या बाहेरगावच्या अनोळखी लोकांनी आपली तोंडे बघत प्रवास करावा, अशी वासना या इंटुक माणसांच्या मनात नेमकी का जन्मत असेल, कोण जाणे! अशा एकाला विचारलं, तर तो म्हणाला, फ्लेक्सवर असलो की गावात आपलं वजन वाढतं. मला ही फारच भारी गोष्ट वाटली. प्रत्येक काळाने काही अति सवंग गोष्टी प्रसवलेल्या असतात, त्यात सांप्रतकाळी फ्लेक्सचं हे असलं महात्म्य ही थोर सवंग गोष्ट आहे. पूर्वी गावात वजन वाढवायचं असलं तर वर्षानुवर्षे गावासाठी राबावं लागायचं. आता निव्वळ फ्लेक्सवर झळकून ती किमया होते, असं या लोकांना वाटतं ही आणखीच ग्रेट सवंग गोष्ट. गावपुढाऱ्यांचे वाढदिवस वगैरेच्या निमित्ताने उभारलेले काही फ्लेक्स इतके मोठे आणि उदंड संख्येने असतात की त्यांच्या खर्चात गावात एखादी नवी नळयोजना होऊ शकेल. 'विकास' ही मुख्यतः फ्लेक्सवर जन्मणारी, वाढणारी आणि तिथेच आटोपून जाणारी गोष्ट झाली आहे. आपल्या लहानपणी गावात गावाचं गावपण संपवून टाकणारा विकास नव्हता; तरीही तिथे 'विकास' असायचा. गावाला खळाळता ओढा होता. एक चित्रासारखी नीटस रेखीव शाळा होती. शाळेच्या अंगणात झाडं होती. झाडांवर कुलकुलणारी पाखरं होती. चिखलात पाऊल रुतणाऱ्या पायवाटा होत्या, तरीही मधूनमधून गावकऱ्यांनी श्रमदानातून बांधलेला खडीचा रस्ता होता. कामांची 'उद्घाटनं' व्हायची नाहीत, तरीही कामं व्हायची. शाळेच्या भिंतीवर हौसेने सुविचार लिहून देणारे किंवा देवळाच्या आतल्या भिंतींवर पुराणातली कमाल सुरेख चित्रं चितारून देणारे पेंटर लोक आता कुठे गेले कुणास ठाऊक. गावकामाची चार ओळींची बातमी एखाद्या वर्तमानपत्रातून आली की या लोकांना कृतकृत्य वाटायचं. बातमीसोबत श्रम करणाऱ्या त्या माणसांचा फोटो छापून येणं, म्हणजे तर जन्मभराची आठवण होऊन बसणं. गावाच्या ललाटरेषेवर 'कोनशिला' नसायची आणि म्हणून त्यावर भंपक पुढाऱ्यांची नावेही नव्हती. गावात एखादा रस्ता मंजूर झाला, तर रस्त्याची लांबी किती, रुंदी किती, खर्च किती यापेक्षा तो कोणाच्या प्रयत्नांतून झाला यावर अधिक वाद होतात. नखभर कामाची हातभर लांबरुंद भूमीपूजनं होतात, श्रेयवादासाठी मारामाऱ्या घडून येतात. जणू रस्ता माती, खडी आणि डांबराचा नसून उठवळ पुढाऱ्यांच्या प्रतिष्ठेचा बनलेला असतो. तो ज्या दिशेने जातो, त्या दिशेने राजकारणाचीही पावले वळत असतात. निवडणुकांच्या दिवसात तर फ्लेक्सवाल्यांच्या दुनियेत विलक्षण चैतन्य पसरतं. वर्षानुवर्षे काळोखात उभे असलेले खांब अचानक उजळतात. खड्डे भरले जातात. गटारं स्वच्छ होतात. आणि या चिमूटभर कामांच्या जाहिरातींचे अवकाशव्यापी फ्लेक्स झळकायला लागतात. आपलं गाव माणसांचं नसून इथे निव्वळ कार्यकर्त्यांचीच वस्ती आहे की काय अशी शंका यावी, इतकी बारकीबारकी चमत्कारिक तोंडे नव्याने फ्लेक्सवर गर्दी करायला लागतात. फ्लेक्सवर आपलं नाव कोरण्याची प्रत्येकाला झालेली उठवळ घाई हे या काळाचं चरित्र झालं आहे.




## संस्कृत सुभाषित

गुरूची सेवा करी जो नर, तोचि उतरे पैलपार,त्यासी
कै से दु:ख घोर,सदासुखी तोचि होय.

अर्थ : हाच तो दृढभाव, गुरूकृपा झाल्याशिवाय परमेश्वरप्राप्ती होत नाही. हा मोक्षमार्गातील शाश्वत सिद्धांत आहे.

## गुरु वचन

### मानवास हावरटपणा मारक

प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षमतांचे निरीक्षण केले पाहिजे व हावरटपणाविषयी नेहमी सावध राहिले पाहिजे. जे हावरट असतात ते आपली भूक, झोप इत्यादी सर्व गमावून बसतात. इच्छा नियमित केल्यामुळे आरोग्य सुदृढ राखण्यात मदत होते व जीवन नैसर्गिक नियमांनुसार चालते. हे नियम किंवा शिस्त म्हणजे इच्छा दाबणे नसून आपल्या क्षमतेनुसार समतोल रोखणे आहे. जास्त खाणे, झोपणे, जागरण आरोग्यासाठी हानिकारक आहे. असे केल्यामुळे शरीरातील विविध यंत्रणा बिघडतात व जीवनाचा उद्देश्यच नष्ट होतो. यामुळे मेंदू क्षीण होतो, हीनभावना निर्माण होते व आत्मविश्वास नष्ट होतो. क्रोध दूसरा नकारात्मक संवेग आहे जो चार मुळ प्रवृत्तीतून निर्माण होतो. जेव्हा एखाद्याची इच्छा पुर्ण होत नाही तेव्हा त्याचे उद्विग्न होते व त्यातून संताप निर्माण होतो म्हणून व्यक्तीने संताप कसा नियंत्रित करावा? हे जाणले पाहिजे.

सर्वप्रथम व्यक्तीने हे लक्षात घेतले पाहिजे की, कुठली इच्छा त्याच्या विकासात सहायक आहे किंवा मारक आहे. जर बुद्धीला शिस्त लावली तर या कामात मदत मिळेल. जर एखाद्या व्यक्तीने ही योग्यता आपल्यात विकसित केली तर राग आल्यानंतर तो स्वत: विषण करेल की, तो का चिडला व त्याची कुठली इच्छा पुर्ण झाली नाही. असे करुन त्यास आपल्या रागाचे कारण समजू शकेल.

## उपदेशकथा

### जे घडते ते कल्याणाचे

एक संत सारखे म्हणायचे, जे घडते ते कल्याणाचे असते. एका वात्रट माणसाने त्यांची परीक्षा घेण्याचे योजले. त्याने त्या संताला घरी जेवायला बोलावले. संताने कबूल केले. जेवणामध्ये त्या माणसाने भाजी व आमटी या दोन पदार्थांना बिनवासाच्या एरंडेलची फोडणी मुद्दाम दिली. संत पोटभर जेवला. त्याने भाजी व आमटी पुन्हा पुन्हा मागितली. संध्याकाळी एरंडेलचा प्रताप सुरू झाला. रात्रभर शौचाला जाऊन संत हैराण झाला पण पहाटेच्या सुमारास त्याला एक मोठा जंत पडला आणि त्याचे शौचास होणे थांबले. तेव्हा तो प्रसन्न होऊन म्हणाला, पाहा! जे घडते ते कल्याणाचे असते हे माझे म्हणणे खरे आहे ना?

कथा उपदेश : वाईटातून चांगले घडले ते असे.

## बाळ्या



बाळ्या, आज शाळेत भरपूर शिकवलं की नाही?
भरपूर नसावं. कारण उद्या पुन्हा बोलावलं आहे.

## पंचांग

| | |
|---|---|
| १२ ऑगस्ट २०२६ | करण:नाग २३:०६:३० |
| बुधवार | सूर्य:कर्क |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:कर्क |
| आषाढ शके | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्– १९४८ | मुस्लिम मास – सफर |
| संवत्सर –पराभवनाम | तारीख – २८ |
| अयन– दक्षिणयन | विशेष |
| मास– आषाढ | खग्रास सूर्यग्रहण |
| ऋतु– सौर वर्षा | (भारतातून दिसणार |
| कृष्ण पक्ष | नासल्यामुळे वेधादि |
| तिथि:अमावस्या | नियम पाळू नयेत) |
| २३:०६:३० | विश्वनाथबाबा फडके |
| नक्षत्र:पुष्य ०७:५९:३० | पुण्यतिथी – अकोट |
| नक्षत्र:ओषा ३०:०६:२०+ | (अकोला) |
| योग:व्यतीपात १५:२५:२२ | दर्श अमावास्या |
| करण:चतुष्पाद | अमावास्या समाप्ती |
| १२:२७:४३ | रात्रौ ११.०६ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०३८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 7 | | 8 | 3 | | 1 | | |
| | 8 | | | 2 | | 7 | 9 | 3 |
| 2 | | 3 | | | 9 | | 8 | |
| 7 | 6 | | | | | | | 1 |
| | | 2 | | | | 5 | | |
| 1 | | | | | | | 2 | 4 |
| | 4 | | 3 | | | 2 | | 9 |
| 5 | 3 | 7 | | 9 | | | 4 | |
| | | 1 | | 4 | 8 | | 5 | 7 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०३७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 7 | 9 | 3 | 8 | 6 | 5 | 1 | 2 |
| 1 | 3 | 5 | 7 | 4 | 2 | 6 | 8 | 9 |
| 6 | 2 | 8 | 5 | 1 | 9 | 7 | 4 | 3 |
| 2 | 6 | 7 | 4 | 3 | 5 | 8 | 9 | 1 |
| 9 | 4 | 3 | 1 | 6 | 8 | 2 | 7 | 5 |
| 5 | 8 | 1 | 9 | 2 | 7 | 3 | 6 | 4 |
| 8 | 9 | 6 | 2 | 5 | 1 | 4 | 3 | 7 |
| 3 | 1 | 2 | 6 | 7 | 4 | 9 | 5 | 8 |
| 7 | 5 | 4 | 8 | 9 | 3 | 1 | 2 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९६० – इचो पहिला पहिला कम्युनेकेशन सॅटेलाईट लाँच झाला.
- १९८१ – आयबीएमने आपले पर्सनल कम्प्युटर लाँच केले.
- १९८५ – जपान एअरलाईन्स १२३ माऊंट ओगुराला धडकला. या अपघातात ५२० जण ठार झाले.
- २००७ – पश्चिमी केनियातील भूस्खलनामुळे २० जण ठार झाले.
- २००८ – व्हिएतनामच्या उत्तर भागात उष्णकटिबंधीय वादळामुळे मुसळधार पावसानंतर आलेल्या पुरामुळे आणि भूस्खलनात ११२ लोकांचा मृत्यू झाला.

### राष्ट्रीय

- १९४२ – भारतातील जोरदार स्वातंत्र्याच्या मागणीसाठी सुरू झालेले 'भारत छोडो' आंदोलन मोडून काढण्यासाठी ब्रिटिश सरकारने पुण्यामध्ये रणगाड्यातून गोळीबाराच्या फैरी झाल्या.
- १९७८ – लंडनमध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत भारताच्या हॉकी संघाने सुवर्णपदक मिळविले.
- २००६ – भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड' (भेल) ने उत्कृष्ट निर्यातीसाठी दिला जाणारा 'इंजिनिअर एक्सपोर्ट प्रमोशन काउंसिल' (ईईपीसी) चा पुरस्कार जिंकला.

### जन्म

- १९१० – युसुफ बीन इसाक, सिंगापूरचे पहिले राष्ट्रपती.
- १९१९ – डॉ. विक्रम साराभाई, पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ तसेच अवकाश संशोधन कार्यक्रमाचे शिल्पकार.

### निधन

- १८४८ – जॉर्ज स्टीफन्सन, रेल्वे इंजिनचा शोध लावणारे थोर संशोधक.
- १९२२ – आर्थर ग्रीफीथ, आयर्लंडचे राष्ट्राध्यक्ष.

## : SMS :

Papa: Beta shaadi ke baad sasural kaisi lagi?
Beta: Papa bahut achhi hai...
Papa: Fir muh kyu latka hua hai?
Beta: Bas mummy keh rahi thi "apne ghar jao

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२ | २३.१ |
| अहमदनगर | ३१.२ | २२.८ |
| अकोला | ३३.१ | २६.१ |
| अमरावती | २९.४ | २५.७ |
| बीड | ३६ | २६.३ |
| भंडारा | ३४.४ | २६.१ |
| बुलढाणा | ४४.८ | ३१.५ |
| चंद्रपूर | ३५.७ | २६.३ |
| चेन्नई | ४१.८ | २७.५ |
| नवी दिल्ली | ४४.३ | २७.६ |
| धुळे | ३५.९ | २५.३ |
| गोंदिया | ३१.६ | २५.८ |
| जळगाव | ३४ | २५.४ |
| कोल्हापूर | ३०.७ | २२.९ |
| लातूर | ३२.५ | २३.५ |
| मुंबई | ३६ | ३० |
| नागपूर | ३४.३ | २६.३ |
| नांदेड | ३४.७ | २५.५ |
| नंदूरबार | ३१.७ | २४.५ |
| नाशिक | ३०.८ | २३.४ |
| पुणे | २८.८ | २२.५ |
| पंढरपूर | ३४.५ | २३.८ |
| सातारा | ३०.९ | २२.८ |
| सांगली | ३२.९ | २३.५ |
| सोलापूर | ३४.४ | २४.२ |
| वर्धा | ३३.६ | २६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : दक्षिण नवीन संबंधांचा फायदा होईल. धाडसाने कामे होणार नाही. काळजी घ्या.

**तुळ :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : पूर्व कामात वाढ होईल.अधिकारी वर्गाचे सहकार्य मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व नशीब साथ देणार नाही. आपल्या मनमोकळेपणाचा फायदा दुसरे लोक घेतील. वादापासून दूर राहावयास हवे.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम कामे यशस्वी होतील. शारीरिक आरोग्य उत्तम राहिल. मित्रांचे संपूर्ण सहकार्य लाभेल.

**मिथुन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पूर्व प्रतिष्ठा वाढेल. सहकार्यांच्या अपेक्षा पूर्ण कराल. धर्माविषयी आस्था वाढेल. कर्ज आणि खर्चात कपात करा.

**धनु :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व कौटूंबिक समस्यांचे समाधान होईल. एखाद्या महापुरुषाशी भेट होईल. आर्थिक स्थिती खालावलेली असेल.

**कर्क :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पश्चिम खर्चाची कामे होतील. जुन्या कामातील अडथळे दूर होतील. मित्रांचे सहकार्य लाभेल.

**मकर :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण प्रयत्न अयशस्वी झाल्याने मन दु:खी होईल.एखाद्या जवळच्याच्या व्यवहारात प्रतिकूलता येईल.


**सिंह :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पश्चिम पैसे हातात येतील. एखाद्याच्या सहकार्याने कामात यश मिळेल. परिजनांमुळे तणाव होऊ शकतो.

**कुंभ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण स्पष्ट धोरणांमुळे अनुकूलता येईल. जीवनात आशाजनक स्थिती निर्माण होईल.

**कन्या :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम मुलांमुळे तणाव निर्माण होऊ शकतो. एखाद्या वादावर तोडगा निघेल.

**मीन :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पूर्व कर्जात कपात होईल. कामातील अडथळे दूर होतील. नवीन कामे जुळून येतील. अडचणी निर्माण होऊ शकतात.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०३८



### आडवे शब्द

१. सट्टा
४. कुणाकडे हा धनाचा असतो तर कुणाकडे गुणांचा!
६. राक्षस
७. नवविवाहितांचा श्रावणसण
१०. चटकन, त्वरित
१२. पक्ष, कड
१३. साजण
१४. जीत
१५. वर्ण, रंग
१७. विठ्ठलपत्नी
१८. बोटाइतके, छोटा तुकडा
२०. मजकुराच्या प्रती बनवणारा
२२. हिरकणीमुळे प्रसिद्धीस आलेला रायगडावरील कडा
२४. वार्ताहर
२६. शाळेत यातून 'वाटावाटी' करतात
२८. धोबी
३०. जमिनीखाली येणारे 'खोड'
३१. उत्सव
३२. संपणे
३४. निवाड्याचे ठिकाण
३६. सरावाने निष्णात
३८. वांगयाचा झणझणीत पदार्थ
४०. दुनिया
४२. नेहमी तय्यार!
४३. नृत्यकलेचे दैवत
४६. दंगामस्ती, मौज
४७. देह, शरीर
४९. ताणल्यास तुटणारे
५१. दोनवेळा म्हटल्यास फारच बडबड!
५३. थरथर
५५. अतर्क्य घटना
५७. धोकादायक (हिंदी)
५९. जेव्हा (संस्कृत)
६१. नट पिळण्याचे साधन
६२. घनघोर युद्ध
६३. डाळीचे कालवण
६४. प्राण्यांचे शस्त्र
६६. वन्य, रानटी
६९. आजीची आजी
७३. कडक व चिवट
७४. धनी
७६. वागणूक
७७. कथेचा गोषवारा
७८. गीत
७९. वाटप
८०. माकडीण
८१. राजकीय आखाड्यात कांदेपोह्याशी टक्कर घेणारा पदार्थ

### उभे शब्द

२. तीट
३. आवाज
४. कोळशाची पूड
५. अपात्र
६. नशीबवान
७. कबूल, संमत
८. भाद्रपदात माहेरी येणाऱ्या ज्येष्ठा–कनिष्ठा
९. चेहऱ्यावरील तेज
११. मान ठेवणे, आदर करणे
१४. जनक राजाची मुलगी, सीता
१६. नूतन
१७अ. 'आला --- समिंदर, त्याला नाही धीर' (ज्योत्सना भोळे यांचे गाजलेले गीत)
१८. बकरा
१९. पूजाअर्चा सांगणारा ब्राह्मण
२०अ. स्थूल
२१. या दोन वेळा चुकवू नयेत अशी जगरहाटी आहे
२३. मला
२४. दूरचा नातेसंबंध
२५. सेवक
२७. श्रीकृष्णाचे वाद्य
२९. लेंगा
३०. श्रीकृष्णाचा मामा
३३. रत्न (हिंदी)
३५. वाहन
३७. बोबडी वळणे
३८. रमताराम
३९. चांदणी
४१. शिडाचे जहाज
४४. ताणलेल्या दोरीचा अवाज
४५. सोन्याचा धागा
४६. पकड!
४८. विनंती, मागणी
५०. अधिकउणे ताकद (हिंदी)
५२. करा घेऊन मिरवणारी
५३. बांगडी, कडे
५४. डोळा
५६. उन्हाची तीव्रता
५८. तमाशातील रूपवती
६०. येऊन पोहोचणे
६१. दूर गेलेला, वंचित
६५. भयानक, भयंकर
६६. पोटातील कृमी
६७. किल्लेदार
६८. नाहकच 'एकाक्ष' म्हणून ओळखला जाणारा पक्षी
७०. डोंगर
७१. वाचन, पारायण
७२. आयुष्य
७३. चणचण
७४. माणूस
७५. सततची मागणी, हट्ट
७८. खेडे, वस्ती

### जम्बो शब्दकोडे क्र. १०३७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.रजत ४.वसंत शिशिर ८.ताक १०.पोक ११.क्षमावंत १३.समोरासमोर १५.गळचेपी १६.कामदार १९.कणखर २०.वतनदार २३.खळखळाट २६.फार २७.रस २८.पटपट ३०.कालहरण ३१.सामना ३२.टोपली ३४.लीनता ३६.वायदा ३७.पण ३९.रयत ४२.तपास ४४.रवा ४६.जीवन ४९.क्षमा ५०.चरस ५३.सटीसामाशी ५६.शानदार ५९.मदन ६१.तरू ६२.जन ६३.मालदार ६५.समा ६६.द्विशतक ६८.नरवीर ७०.माती ७१.बरकत ७३.रणबावरा ७५.नर ७७.यमक ७९.डम ८०.गार ८२.पावा ८४.अवास्तव ८६.अवाच्या सवा ८९.खोटारडा ९०.मस्त ९१.कडबू ९२.वहिनी

उभे उत्तर : १.रक्षक २.जमा ३.तवंग ५.संतापी ६.शिरकाण ७.रसदार ८.तारा ९.कसरत १०.पोर १२.तळतळाट १४.मोर १७.मखमल १८.ओळ १९.कर्ण २०.वरण २१.दारमदार २२.रसना २३.खटाटोप २४.खपली २५.टपली २६.फारकत २९.टन ३१.साय ३३.पणजी ३५.तार ३६.वासर ३८.रानटी ४०.यक्ष ४१.तमाशा ४३.पाचर ४५.वार्ताहर ४७.वसन ४८.लामा ५१.सकल ५२.समसमान ५४.सारांश ५५.शीतकर ५७.नजर ५८.दानवीर ६०.दमा ६४.दादरा ६६.द्वितीय ६७.तबक ६८.नतमस्तक ६९.रणगाजी ७२.कडवा ७४.बारव ७६.रपाटा ७८.मरू ८१.भवानी ८३.वार ८४.अस्त ८५.वड ८७.च्याव ८८.सही

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### दगडूशेठ गणपती मंदिरात ६५ ब्रह्मवृंदांसह 'अतिरुद्र महायज्ञ'

**पुणे : दैनिक संध्या**

अतिरुद्र यज्ञ ही केवळ पूजा नसून, एक आध्यात्मिक ऊर्जा प्रक्षेपण आहे. एक लघुरुद्र म्हणजे ११ ब्रह्मवृंदांनी ११ वेळा रुद्रपठण करणे, असे ११ लघुरुद्र म्हणजे १ महारुद्र आणि ११ महारुद्र म्हणजे १ अतिरुद्र होय. अतिरुद्राच्या या मोठ्या व्यापकतेमुळे वायुमंडल शुद्धधी होऊन सर्व जीवजंतू दूर होतात व सर्व आजारांपासून मुक्ती मिळते. त्यामुळे संपूर्ण विश्वात शांती व सद्‌भावना निर्मितीकरिता श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्यावतीने मंदिरात अतिरुद्र महायज्ञ केला जात आहे. तब्बल ६५ ब्रह्मवृंद यामध्ये सहभागी झाले आहेत. अतिरुद्र महायागाचे हे ६ वे वर्ष आहे. मंदिराच्या सभामंडपात भव्य होमकुंड साकारुन हे अतिरुद्र होम करण्यात येत आहेत. केवळ धार्मिक विधी नाही, तर सामूहिक आध्यात्मिक जागरण असलेला सलग २१ दिवसांचा अतिरुद्र महायज्ञ आहे. वेदमूर्ती नटराज शास्त्री यांसह ६५ ब्रह्मवृंद यामध्ये सहभागी झाले आहेत. वेदांनुसार, या यज्ञामुळे व्यक्ती, कुटुंब व जग यांच्यात संतुलन व शुद्धता येते. हा यज्ञ जेथे होतो तेथे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. मनुष्यातील चेतनापेशी उर्जित होतात आणि कार्यमग्नता वाढते. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, महासंकल्प, नांदी श्राद्ध, वैष्णव श्राद्ध, पुण्याह वाचन, महान्यास, गणेश अर्चना, रुद्र जप, गणेश याग, रुद्र होम, अरुणाप्रश्न यागाने अतिरुद्र महायज्ञास प्रारंभ झाला होता. आता दररोज गणेशयाग, रुद्र होम, महंण्यास मंत्रघोष सुरु असून दुर्गा होम, स्वयंवर पार्वती होम, नक्षत्र होम, पुरुषसुक्त होम, महासुदर्शन होम, संतान गोपाल कृष्ण होम, मेधा दक्षिणा मूर्ती होम यांसह दररोज विविध धार्मिक विधी होत आहेत. मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांद्वारे जगाच्या कल्याणाकरिता व आरोग्यसंपन्न समाजाकरीता प्रार्थना करण्यात येत आहे. त्यातील अतिरुद्र होम हा या धार्मिक विधींतील सर्वोच्च बिंदू आहे. गंगा, यमुना, इंद्रायणी, पंचगंगा, मुठा, अष्टविनायक येथील नद्या, ज्योर्तिलिंग नद्या, रामेश्वरम २१ कुंडांचे जल याकाळात वापरले जात आहे. तसेच २१ आयुर्वेदिक औषधी वापर होम-हवनाच्या वेळी करण्यात येत आहे. सर्व नद्यांच्या एकत्रित केलेल्या मंत्रोच्चारीत पाण्याचा श्रींना जलाभिषेक करण्यात येत आहे. अतिरुद्र यज्ञामुळे संपूर्ण समुदाय, गाव, शहर किंवा राष्ट्र स्तरावर अनेक अद्‌भूत सकारात्मक बदल घडून येतात. दीर्घकाळचे व मानसिक आजारातून मुक्तता, नकारात्मक ऊर्जा दूर होणे, पर्यावरणातील असंतुलन दूर होते, नैसर्गिक आपत्ती कमी होतात आणि संपूर्ण विश्वात शांती व सद्भावना निर्माण होते, हे अतिरुद्र महायज्ञाचे फायदे आहेत. त्यामुळे दगडूशेठ गणपती मंदिरात मागील पाच वर्षांपासून हा यज्ञ करण्यात येत आहे. शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट पर्यंत दररोज दुपारी ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत धार्मिक विधी मंदिरात सुरु राहणार आहेत. शनिवारी (दि.१५) ३३ कोटी देवता याग व हर्विद्रव्य वनौषधीसहित पूर्णाहुती होणार आहे. तरी भाविकांनी मंदिरात अतिरुद्र याग व विविध धार्मिक कार्यक्रमांत सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

### डॉ. कुमार सप्तर्षी म्हणजे मुक्त विद्यापीठ : कार्यकर्त्यांची भावना

**पुणे : दैनिक संध्या**

डॉ. कुमार सप्तर्षी म्हणजे मुक्त विद्यापीठ होते. त्यांनी केलेली विविध आंदोलने, शंकराचार्यांना दिलेले चर्चेचे आव्हान, युक्रांद, सत्याग्रही विचारधारा, सहवासातून समजलेले व्यक्तिमत्व याबद्दल मान्यवरांकडून डॉ. कुमार सप्तर्षींच्या आठवणींना उजाळा मिळाला. यावेळी ४० कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या कोथरूड येथील गांधीभवन येथे ९ ऑगस्ट या क्रांती दिनी ३४ व्या गांधी दर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. युवक क्रांती दलाचा रौप्य महोत्सवही या दिवशी साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने रक्तदान शिबिर, चित्रपट, पुस्तक प्रकाशन आणि युवक क्रांती दलाच्या कार्याच्या आठवणी तसेच युक्रांदचे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या स्मृतींना उजाळा देणारी मनोगते यांचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल यांच्या संयुक्त विद्यामाने याचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल यांनी दिग्दर्शित केलेला 'अंकुर' चित्रपट यावेळी दाखवण्यात आला. ज्येष्ठ लेखक शंकर निकम यांनी लिहलेल्या 'आशियाचा दीपस्तंभ जवाहरलाल नेहरू' या पुस्तकाचे यावेळी प्रकाशन करण्यात आले. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली रक्तदान शिबीर व अंकुर चित्रटाचे प्रदर्शन झाले. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे विश्वस्त रमेश आढाव , मच्छिंद्र गोरडे, एम. एस.जाधव , सुनील पाटील यावेळी उपस्थित होते मधू मोहिते, सुशीला मोराळे, अंजली सोमण, अंजली कुलकर्णी, विकास लवांडे, ॲड. गोपाळ गुणाले, सुदर्शन चकाले, सचिन पांडुळे, कॉम्रेड किशोर ढमाले, विमल पाटील आदींनी कुमार सप्तर्षी व युक्रांद मधील आठवणी सांगत आपल्या भावना व्यक्त केल्या. या सत्राचे अध्यक्ष विश्वस्त सचिव अन्वर राजन होते. मधू मोहिते म्हणाले की, युवक क्रांती दल म्हटले की डॉ. कुमार सप्तर्षी हे नाव डोळ्यासमोर येते. दलित जाती या क्रांतीच्या दूत आहेत अशी भूमिका डॉ. सप्तर्षी यांनी मांडली. माझे चौथी पर्यंतचे शिक्षण कोकणात झाले. पण गावगाड्याचा परिचय मला राशिनला गेल्यावर परिचय झाला. डॉ. कुमारच्या नेतृत्वाखाली आमची पाठशाळा झाली. डॉ. कुमार आम्हाला बोलकं करायचा. जनता पार्टीचे विचार आपल्या विचारांशी जुळत नाही हे पाहून डॉ. कुमारने वेगळे काम सुरू केले.

### प्रमुख बँका आणि एनबीएफसी च्या सहकार्याने फिक्स्ड डिपॉझिट (एफडी) सेवेचा भव्य शुभारंभ

**पुणे : दैनिक संध्या**

भारतातील प्रमुख फिनटेक प्लॅटफॉर्म फोनपे ने आज आपल्या युजर्ससाठी प्रमुख बँका आणि एनबीएफसी च्या सहकार्याने फिक्स्ड डिपॉझिट (एफडी) वितरणाची अधिकृत घोषणा केली आहे. आपल्या आर्थिक सेवांचा विस्तार करत फोनपेने शिवालिक स्मॉल फायनान्स बँकेसोबत भागीदारी करून लहान बचतीसाठी 'दैनिक रिकरिंग डिपॉझिट' (एसआयपी) हे अत्यंत सुलभ प्रॉडक्ट बाजारात आणले आहे. या सुविधेमुळे लहान-मोठे व्यापारी, पगारदार वर्ग आणि नवउद्यमी रोजच्या रोज फक्त ₹100 ची बचत करून सुरक्षित भविष्याची सुरुवात करू शकतात. या सुविधेमुळे फोनपे ॲपवरून थेट फिक्स्ड डिपॉझिट उघडण्याची ही प्रक्रिया अतिशय सोपी आणि सुरक्षित आहे. युजर्स फोनपेवर उपलब्ध असलेल्या विविध बँकांच्या एफडीची तुलना करून सर्वोत्तम परतावा देणारा पर्याय निवडू शकतात. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, या फिक्स्ड डिपॉझिट वर डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन कडून ₹5 लाखांपर्यंतचे विमा संरक्षण मिळते. तसेच, वेगवेगळ्या बँकांमधील आपल्या सर्व एफडींचे व्यवस्थापन युजर्स एकाच फोनपे ॲपवरून सहजपणे करू शकतात. या घोषणेचे प्रमुख आकर्षण म्हणजे शिवालिक स्मॉल फायनान्स बँकेच्या धोरणात्मक भागीदारीत सुरू केलेले दैनिक रिकरिंग डिपॉझिट हे प्रॉडक्ट आहे.

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचा मंगळवारी ११वा वर्धापन दिन

## प्रा. राम शिंदे यांची प्रमुख उपस्थिती; राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत बुधवारी 'विद्यारंभ-२६'चे आयोजन

■ **पुणे (दै. संध्या)**

एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी एडीटी) विद्यापीठ, विश्वराजबाग, लोणी-काळभोर, पुणे येथे येत्या मंगळवारी (११ ऑगस्ट २०२६) विद्यापीठाचा ११वा वर्धापन दिन भव्य कार्यक्रमाद्वारे साजरा करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. तसेच, इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर)चे माजी महासंचालक पद्मश्री प्रा. डॉ. बलराम भार्गव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तसेच, बुधवारी (१२ ऑगस्ट) एमआयटी एडीटी विद्यापीठात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या ११व्या बॅचच्या स्वागत समारंभाचे, अर्थात 'विद्यारंभ-२६' या तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राचे महामहिम राज्यपाल जिष्णु देव वर्मा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. याशिवाय, महाराष्ट्राचे माजी अतिरिक्त पोलीस महासंचालक जे. डी. लक्ष्मीनारायण हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

हे दोन्ही कार्यक्रम विद्यापीठातील 'स्वामी विवेकानंद सभामंडपात' हजारो विद्यार्थी व पालकांच्या उपस्थितीत पार पडणार आहेत. माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमांना एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, कार्यकारी संचालक प्रा. ज्योती ढाकणे, कार्यकारी संचालक प्रा.डॉ. विनायक घैसास, प्रोवोस्ट डॉ.सायली गणकर, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, डॉ. नचिकेत ठाकूर आणि कुलसचिव डॉ. महेश चोपडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

वर्धापन दिन तसेच 'विद्यारंभ-२६' या तीन दिवसीय कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विद्यापीठात राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, संशोधन, नवोपक्रम व विद्यार्थी विकास उपक्रमांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच, याप्रसंगी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठात यंदाही मोठ्या प्रमाणावर नव्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यांच्या स्वागतासाठी तीन दिवस विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये विविध क्षेत्रांतील नामवंत उद्योगतज्ज्ञांच्या मार्गदर्शनपर सत्रांचाही समावेश असणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्र. कुलपती डॉ.रामचंद्र पुजेरी आणि कुलसचिव डॉ. महेश चोपडे यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.




### राष्ट्रीय गरिमा पुरस्काराचेही वितरण

'विद्यारंभ-२६' या कार्यक्रमाच्या निमित्ताने राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांना 'राष्ट्रीय गरिमा पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये केंद्रीय विद्यापीठ, राजस्थानचे कुलगुरू डॉ. आनंद भालेराव, महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर आणि एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. महेश चोपडे यांचा समावेश आहे. या मान्यवरांना राज्यपालांच्या हस्ते 'राष्ट्रीय गरिमा पुरस्कार' प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठाचे प्र-कुलपती डॉ. नचिकेत ठाकूर यांनी याप्रसंगी दिली.

## कर्म, ज्ञान आणि भक्तीचे मार्ग भगवंतापर्यंत घेऊन जातात

■ **पुणे (दै. संध्या)**

कर्म, ज्ञान आणि भक्ती हे तिन्ही मार्ग आपल्याला एका परमात्म्यापर्यंत घेऊन जाणारे आहेत. जिथे पोहोचायचे तो एक भगवंत आहे ; पण ज्याच्या माध्यमातून पोहोचायचे ते अनेक आहेत. कर्मामध्ये परम तत्त्वापर्यंत जाण्याचे सामर्थ्य आहे आणि हे कर्म आपल्याला नैष्कर्म्य सिद्धीपर्यंत घेऊन जाते, असे प्रतिपादन मानकोजी महाराज बोधले यांचे ११वे वंशज ह.भ.प. डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी केले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे जंगली महाराज रस्त्यावरील हॉटेल सेंट्रल पार्क येथे चातुर्मासानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ते बोलत होते. ट्रस्टचे विश्वस्त, मंडळाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

ह.भ.प. डॉ. जयवंत महाराज बोधले म्हणाले, एकंदरीत कीर्तन आणि भक्ती या शब्दांचा विचार करत असताना नवविधा भक्तीमध्ये कीर्तन भक्तीचा विशेषत्वाने उल्लेख आपल्याला दिसून येतो. श्रवणम्, कीर्तनं विष्णोः, स्मरणं, पादसेवनम्, अर्चनं, वंदनं, दास्यं, सख्यम्, आत्मनिवेदनम् हा भक्त प्रल्हादाच्या मुखातला, श्रीमद् भागवतातला श्लोक अत्यंत प्रसिद्ध आहे. त्यामध्ये द्वितीय क्रमांकाची कीर्तन भक्ती सांगितली आहे.

कीर्तन हे काय आहे, हे कळण्याआधी भक्ती म्हणजे काय समजले पाहिजे. त्याकरिता तीन मार्गांचा विचार केला पाहिजे. एक कर्म नावाचा मार्ग आहे, दुसरा ज्ञान नावाचा मार्ग आहे आणि तिसरा भक्ती नावाचा मार्ग आहे. या तीनही मार्गांचा विचार भगवद्गीतेमध्ये आणि पर्यायाने ज्ञानेश्वरीमध्ये विस्ताराने आलेला आपल्याला दिसून येतो.

## तरुणांनी देशाला अखंड ठेवा आणि महासत्ता बनवा
### लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोरकर (निवृत्त)

■ **पुणे (दै. संध्या)**

युवा पिढीला आपल्या मतांचे प्रदर्शन करण्याचा अधिकार आहे आणि तो प्रत्येकाने बजावला पाहिजे. मात्र, भारत तेरे टुकडे होंगे अशा घोषणा मंजूर नाहीत. स्वातंत्र्यानंतर वर्दीतील ७८ हजार जवानांनी देशासाठी आपले प्राण गमावले आहेत. त्यांनी देशाचे तुकडे करण्यासाठी नव्हे, तर भारत अखंड ठेवण्यासाठी बलिदान दिले आहे. हा देश एकसंध, संघटित आणि महासत्ता बनविण्याची जबाबदारी आता तरुणांच्या हातात आहे. तरुणांनी देशाला अखंड ठेवून महासत्ता बनवावे. भारतीय सेना ही देशातील जनतेची सेना आहे आणि तिचा प्रत्येक नागरिकाला अभिमान वाटला पाहिजे, असे मत लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोरकर (निवृत्त) यांनी व्यक्त केले.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसतर्फे स्वतःच्या जीवाची पर्वा न करता नागरिकांच्या संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे, पोलीस अंमलदार रणजीत पाटील, देवा चव्हाण, पवन माने आणि पोलीस हवालदार निलेश भोरडे यांना यंदाचा आठवा शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. नऱ्हे येथील शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित या पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोरकर (निवृत्त) होते. विंग कमांडर विनायक डावरे (निवृत्त), संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर आदी उपस्थित होते. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन पुरस्कारार्थींचा गौरव करण्यात आला.



## संतांच्या उंचीवर संपूर्ण समाजाने यावे अशी संतांची तळमळ : ह.भ.प. उमेश महाराज दशरथे

■ **पुणे (दै. संध्या)**

उंचीवर पोहोचलेला माणूस आपल्या उंचीचे रहस्य सांगत नाही, कारण त्याच्या योग्यतेला कोणी यावे, असे त्यांना वाटत नाही. पण संत जीवन हा एकमेव अपवाद आहे. ज्यांना आपण ज्या उंचीवर आहोत, तिथे संपूर्ण समाजाने यावे, असे वाटते, असे प्रतिपादन परभणी-मानवत येथील वारकरी भूषण ह.भ.प. उमेश महाराज दशरथे यांनी केले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे जंगली महाराज रस्त्यावरील हॉटेल सेंट्रल पार्क येथे चातुर्मासानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ते बोलत होते. ह.भ.प. उमेश महाराज दशरथे म्हणाले, तत्त्वज्ञानामध्ये काय असते? कोणत्याही कर्माचे फळ हे कृती देत नाही; त्याच्याविषयी असणारी आसक्ती ही माणसाच्या फळाला कारणीभूत असते. हे मी केले, असा जो अहंकार हृदयात असतो, तो अहंकार माणसाला दुःख देतो. श्रीमद् भागवतामध्ये एकादश स्कंधामध्ये एक गीत येते. माणसाला जिथे आसक्ती, ते दुःखाला कारणीभूत. पण आम्ही काय करतो? कर्माची आसक्तीच धरत नाही. उदास वृत्तीने कर्म करतो आणि कर्म आम्हाला लागत नाही, असेही त्यांनी सांगितले.




## श्री महालक्ष्मी मंदिरातर्फे वारकऱ्यांसाठी वाल्हे येथे भोजन व्यवस्था

■ **पुणे (दै. संध्या)**

श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग तर्फे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पंढरपूरहून आळंदीस परत येणाऱ्या श्रींच्या वारी प्रवासात वाल्हे येथील शाळेत वारकऱ्यांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील २ हजार ५०० वारकऱ्यांनी या सेवेचा लाभ घेतला.

ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल तसेच प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम दरवर्षी केला जातो. याप्रसंगी मंदिराचे विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, प्रवीण चोरबेले यांसह विश्वस्त पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. माऊलींच्या पादुकांना नैवेद्य दाखवून वारकरी भोजनाला प्रारंभ झाला. मंदिराचे विश्वस्त, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सर्व व्यवस्था केली होती. पुण्यात पालखी आगमनाच्या वेळी देखील मंदिरामध्ये वारकऱ्यांसाठी आरोग्य सेवा दिली जाते. विविध प्रकारच्या तपासण्या व औषध वाटप देखील केले जाते. त्याचप्रमाणे पालखीच्या परतीच्या प्रवासात भोजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.




# रेल्वे पोलिसांसाठी त्रिशरण फाउंडेशनतर्फे 'फिट फोर्स'चे प्रशिक्षण

■ **पुणे (दै. संध्या)**

पोलिस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. मात्र, पोलिसांच्या कुटुंबीयांना सोबत घेऊन कुटुंबातील भावनिक संवाद, एकात्मता आणि सकारात्मक वातावरण वाढविण्यासाठी आयोजित करण्यात आलेले 'फिट फोर्स' हे प्रशिक्षण अनोखे ठरले. लोहमार्ग पोलिस आयुक्त एम. राकेश कलासागर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पुण्यातील त्रिशरण एन्लायटन्मेंट फाउंडेशनच्या संकल्पनेतून हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. घाटकोपर येथील रेल्वे कॉलनीतील नवरंग हॉलमध्ये लोहमार्ग पोलिस आयुक्तालयातील पुरुष व महिला पोलिस अमलदार तसेच त्यांच्या पती-पत्नींसाठी झालेल्या या दोन दिवसीय प्रशिक्षणात ५० जोडप्यांनी सहभाग घेतला.

पोलिसांच्या अनियमित ड्युट्या, अचानक येणारी कामाची जबाबदारी, सण-उत्सवाच्या वेळी कर्तव्यावर राहणे आणि मुलांना व कुटुंबीयांना पुरेसा वेळ देता न येणे यामुळे कुटुंबात नकळत मानसिक दुरावा निर्माण होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन कुटुंबातील संवाद वाढविणे, भावनिक नाते दृढ करणे आणि आनंदी वातावरण निर्माण करणे हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता. माजी अतिरिक्त मुख्य सचिव उज्वल उके यांनी एक दिवसीय 'माहोपेक्षा' प्रशिक्षण दिले. व्यक्तिमत्त्व विकास व वर्तणूक प्रशिक्षणावर प्रशांत वाघमारे, तर भावनिक संवाद व एकात्मतेवर प्रज्ञा वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. लोहमार्ग पोलिस दलातील वरिष्ठ अधिकारीही या वेळी उपस्थित होते.

या उपक्रमासाठी वरिष्ठ पोलिस निरीक्षक ज. बा. तांबोळी यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले. पोलिस निरीक्षक रामचंद्र कर्पे, पोलिस उपनिरीक्षक हनुमंत संभाजी धाईंजे, श्रेणी पीएसआय शीतल साप्ते, महिला पोलिस हवालदार रीया सावंत आणि सहाय्यक पोलिस फौजदार सुदेश गोलतकर यांनी मानवी संसाधन शाखेच्या माध्यमातून कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मोलाचे योगदान दिले. प्रशिक्षणाच्या समारोपावेळी अनेक पोलिस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांनी भावनिक अनुभव व्यक्त केले. कुटुंबातील छोटे-छोटे संवादही नात्यांमध्ये मोठी जवळीक निर्माण करू शकतात.



दैनिक संध्या नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक | बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे

### कराडमधील 'विजय दिवस'च्या प्रेरणास्थळांना आलीय अवकळा

**कराड : दैनिक संध्या**

कराड शहरात विजय दिवस चौकात उभारलेला 'अमर जवान' स्मृतिस्तंभ हा भारतीय सैनिकांच्या शौर्याचे आणि विजयाचे प्रतीक आहे. ऐतिहासिक विजयाच्या स्मृती जपण्यासाठी हा स्तंभ उभारण्यात आला असून, त्याच्याभोवती असलेले संरक्षक लोखंडी खांबांची वाहनांच्या धडकेमुळे मोडतोड झाली असून, स्मृतिस्तंभाची झळाळी कमी झाली होती. याचबरोबर यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन 'टाउन हॉल' येथे ठेवलेल्या 'विमान' व 'रणगाडा' खालील कठड्याच्या फरशा तुटून गेल्या आहेत. याबाबत विजय दिवस समारोह समितीच्या वतीने पालिका मुख्याधिकारी व नगराध्यक्षांना निवेदन देऊन त्यांच्याकडून डागडुजीबाबत नुसती आश्वासनेच मिळाल्याने अखेर समितीच्या वतीने स्मृतिस्तंभाच्या झळाळीचे काम हाती घेण्यात आले आहे. अनेकवेळा मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देऊनही प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याची खंतदेखील विजय दिवस समारोह समितीच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. १९७१ आणि कारगिल युद्धातील विजयाच्या आठवणी व जवानांच्या शौर्यगाथा तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी हा परिसर 'विजय दिवस चौक' म्हणून ओळखला जातो. युद्धातील हुतात्म्यांना व शहिदांना नतमस्तक होण्यासाठी या स्तंभावर पुष्पचक्र अर्पण केले जाते. फेब्रुवारी २०२५ मध्ये या 'अमर जवान' स्तंभाला व परिसराला नवी झळाळी देण्यात आली असून, सातारा जिल्ह्यात पहिल्यांदाच येथे 'एलईडी कर्ब स्टोन' बसविण्यात आले आहेत.

### 'ग्रेटर फ्लेमिंगो'चा थाट... हवामान बदलाने गाठला कोयनेचा काठ!

**सातारा : दैनिक संध्या**

दरवर्षी हिवाळ्यात सातारा जिल्ह्याच्या पूर्व भागात मुक्कामाला येणाऱ्या 'ग्रेटर फ्लेमिंगो' (रोहित) पक्ष्यांनी आपल्या परतीच्या प्रवासात प्रथमच बामणोलीत कोयना जलाशयावर विश्रांती घेतली. उजनीसारख्या उथळ पाणथळ जागांवरून आपल्या विणीच्या (प्रजननाच्या) ठिकाणांकडे स्थलांतर करताना थकलेल्या या पक्ष्यांनी मानवी हस्तक्षेप नसलेल्या कोयना जलाशयात एक दिवसाचा मुक्काम केला आणि पुढील प्रवास सुरू केला. या अनपेक्षित भेटीमुळे कोयना परिसराच्या सुरक्षित जैवविविधतेवर समृद्धीची मोहोर उमटली आहे. अनेकांचा असा गैरसमज असतो की, फ्लेमिंगो युरोप किंवा ऑस्ट्रियावरून हजारो किलोमीटरचा प्रवास करून येतात. परंतु, पक्षीविज्ञान आणि भारतीय पर्यावरणशास्त्रानुसार भारतात आढळणारे बहुतांश ग्रेटर फ्लेमिंगो हे देशांतर्गतच स्थलांतर करतात. गुजरातचे कच्छचे रण हे त्यांचे आशियातील सर्वात मोठे प्रजनन केंद्र आहे. हिवाळ्यात कच्छमधील पाण्याची पातळी बदलल्यावर अन्नाच्या शोधात हे पक्षी महाराष्ट्रातील उजनी, जायकवाडी, शिवडी (मुंबई) आणि साताऱ्यातील खटाव (पेडगाव, येरळवाडी) येथील उथळ अन् दलदलीच्या भागात स्थलांतर करतात. एप्रिल-मे महिन्यांत ते पुन्हा प्रजननासाठी गुजरात किंवा वायव्येकडील इराण, मध्य आशियाचा काही भाग याठिकाणी परतीचा प्रवास करतात.

### कराडात सुनेत्रा पवार, उदयसिंह पाटील-उंडाळकर यांच्यात चर्चा

**कराड : दैनिक संध्या**

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू होण्यापूर्वीच जिल्ह्यातील राजकारण तापू लागले आहे. बँकेच्या सत्तेच्या चाव्या कुणाच्या हातात जाणार?, याची गणिते मांडली जात आहेत. अशात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि कराड दक्षिणचे नेते ॲड. उदयसिंह पाटील-उंडाळकर यांची रविवारी सकाळी झालेली भेट आणि 'कमरा बंद' झालेली चर्चा सध्या जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या रविवारी कोल्हापूर दौऱ्यावर निघाल्या होत्या. कोल्हापूरकडे जात असताना त्यांनी अचानक कराडच्या शासकीय विश्रामगृहात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी काही मिनिटे थांबून चर्चा केली. यावेळी राष्ट्रवादी (अजित पवार) चे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोळसकर, ॲड. उदयसिंह पाटील-उंडाळकर, कराड तालुकाध्यक्ष डॉ. सुधीर जगताप, कराड बाजार समितीचे माजी सभापती सुनील पाटील, कराड पंचायत समिती सदस्य नितीन थोरात, धनाजी पाटील, राजेश पाटील-वाठारकर यांच्यासह स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार यांनी कार्यकर्त्यांसोबत चर्चा केल्यानंतर ॲड. उदयसिंह पाटील-उंडाळकर यांच्यासोबत त्यांची काही मिनिटे कमराबंद चर्चा झाली. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली? यामागचे कारण समोर आले नसले तरी सध्या सातारा जिल्हा बँकेच्या निवडणुकीची पार्श्वभूमीवर या भेटीला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार-उदयसिंह पाटील-उंडाळकर यांच्या भेटीमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले, तरी या भेटीने जिल्हा बँक निवडणुकीच्या चर्चेला निश्चितच नवी दिशा दिली आहे. आगामी काळात कोणत्या नेत्यांच्या भेटीगाठी वाढतात, कोणते गट जवळ येतात आणि त्यातून कोणता नवा सत्तेचा फॉर्म्युला आकाराला येतो, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

Jaihind Comprehensive Educational Institute's
**JAIHIND INSTITUTE OF MANAGEMENT & RESEARCH**
Estd.1996
Late. Tatyasaheb Gunjal Founder, JCEI
G.N. 657,660(2), A/P- Vadgaon Sahani, Taluka - Junnar, District – Pune - 412 401
Approved By AICTE New Delhi, Govt. of Maharashtra Affiliated to S.P.Pune University
**ADMISSION NOTICE FOR DIRECT SECOND YEAR 2026-27 M.B.A. M.C.A.** Institute Code MB 6990
Applications are invited for Institutional Admission Round to Direct Second Year (Lateral Entry-1 year course duration) of Full Time Post Graduate Degree Course In MBA & MCA for the Academic Year 2026 - 2027 from candidate who are eligible as per rules of MH-CET CELL. Detail schedule of admission activities and vacancies will be displayed on institute website as per CET Cell guidelines.
**Eligibility for MBA**: B.E/B.Tech./BMS/BBA. (4 Years)
**Eligibility for MCA**: B.E/B.Tech.(Computer Engg./Sci.) BCA (4 Years)
Web-www.jaihind.edu.in Contact - 9766000214,8793237727

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
**ई–निविदा सूचना**
महावितरणकडे नोंदणीकृत असलेल्या नामांकित व अनुभवी पुरवठादार व कंत्राटदार यांचे कडून पिंपरी विभागा अंतर्गत खालील सामानांचा पुरवठा / कामे करण्यासाठी ई – निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्रं. का.अ. /पिंपरी/२६–२७ | सामानांचा / कामाचा तपशील | निविदा रक्कम रू. लाख |
|---|---|---|
| टी–०५ | फ्युज वायर पुरवठा करणे (Fuse wire- 10,12, 24 SWG) | २ |

अधिक तपशीलासाठी कृपया https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळाला भेट द्यावी.
PRO/PZ/103/2026-27 — कार्यकारी अभियंता, पिंपरी विभाग

# सरकारकडून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न

## अफवांवर विश्वास ठेवू नका, मनोज जरांगे-पाटील यांचे आवाहन

■ **कवठेमहांकाळ (दै. संध्या)**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकारकडून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असून समाजाच्या नोंदी, कुणबी प्रमाणपत्रे आणि कागदपत्रांबाबत चुकीची माहिती पसरवली जात आहे. मराठा समाजाने कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता एकजूट कायम ठेवावी, असे आवाहन मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे-पाटील यांनी केले. कवठेमहांकाळ येथील शिंदे पॅलेस, नरघोल रोड येथे सकल मराठा समाजाच्या वतीने आयोजित सभेत ते बोलत होते.

जरांगे-पाटील यांनी राज्य सरकार आणि सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठविली. मराठा समाजाच्या नोंदी रद्द झाल्या, कुणबी प्रमाणपत्रे रद्द होणार किंवा अपलोड केलेल्या कागदपत्रांवर कारवाई होणार अशा प्रकारच्या चर्चा मुद्दाम पसरविल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला. अशा अफवांमुळे समाजात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न होत असून मराठा समाजाने त्याला बळी पडू नये, असे ते म्हणाले. अधिकाऱ्यांनी कोणत्याही राजकीय दबावाखाली काम करू नये. कायद्याच्या चौकटीत राहून आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारेच निर्णय घ्यावेत. केवळ राजकीय आदेशांवर किंवा दबावाखाली समाजाच्या नोंदी व प्रमाणपत्रांबाबत कारवाई करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी त्यांनी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही निशाणा साधला.



## महाराष्ट्रात साडेसहा महिन्यांत २४ वाघांचा मृत्यू; व्याघ्र प्रकल्पाबाहेरील मृत्यूही चिंतेचा विषय

■ **अकोला (दै. संध्या)**



देशात वाघ संवर्धनात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्रात यंदाच्या वर्षी वाघांच्या मृत्यूचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले आहे. १ जानेवारी ते १९ जुलै २०२६ या कालावधीत राज्यात २४ वाघांचा मृत्यू झाला असून, देशभरातील ११० वाघ मृत्यूंपैकी ही संख्या दुसऱ्या क्रमांकावर आहे. सर्वाधिक ३८ वाघांचा मृत्यू मध्य प्रदेशात झाले आहेत.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणच्या (एनटीसीए) संकेतस्थळावरील आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील मृत्यू केवळ व्याघ्र प्रकल्पांपुरते मर्यादित नसून, पेंच, ताडोबा - अंधारी, नवेगाव - नागझिरा यांसारख्या व्याघ्र प्रकल्पांसह चंद्रपूर, ब्रह्मपुरी, नागपूर, गोंदिया, भंडारा, यवतमाळ, अमरावती आणि रामटेक वनक्षेत्रातही नोंदविण्यात आले आहेत. अनेक वाघांचा मृत्यू व्याघ्र प्रकल्पाबाहेरील अधिवासात झाल्याने वाघांचे जंगलाबाहेरील वाढते स्थलांतर आणि त्यासोबतची जोखीम अधोरेखित झाली आहे. वन्यजीव तज्ज्ञांच्या मते, व्याघ्र प्रकल्पाबाहेरील अधिवासांचे संरक्षण, वन्यजीव मार्गिकांचे (कॉरिडॉर) संवर्धन, मानव - वाघ संघर्ष कमी करण्यासाठी उपाययोजना आणि प्रत्येक मृत्यूचे शास्त्रीय विश्लेषण यावर भर देणे अत्यावश्यक झाले आहे.

मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रानंतर कर्नाटक, तामिळनाडू, आसाम, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, केरळ, छत्तीसगड, ओडिशा, आंध्र प्रदेश, तेलंगणा, राजस्थान, गोवा आणि अरुणाचल प्रदेश येथेही वाघांच्या मृत्यूच्या घटना नोंदल्या गेल्या आहेत. काही राज्यांमध्ये वाघांच्या अवयवांच्या जप्तीची प्रकरणेही समोर आली आहेत. मृत्यू झालेल्या वाघांमध्ये बछड्यांचाही समावेश मृत्यू झालेल्या वाघांमध्ये प्रौढ, उपप्रौढ तसेच बछड्यांचाही समावेश आहे. विशेष म्हणजे अनेक बछड्यांच्या मृत्यूची नोंद झाल्याने भविष्यातील वाघसंख्येवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. वन्यजीव अभ्यासकांच्या मते, वाघांची वाढती संख्या ही संवर्धनासाठी सकारात्मक असली तरी अधिवासावर वाढलेला ताण, मानवी हस्तक्षेप, नैसर्गिक संघर्ष आणि अन्य कारणांमुळे मृत्यूचे प्रमाणही वाढत आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांना ड्युटीवर रील्स बनवण्यास बंदी

■ **अकोला (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन(एसटी) महामंडळाने कर्तव्यावर असताना चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांनी सोशल मीडियासाठी रील्स, व्हिडिओ, लाइव्ह स्ट्रीमिंग किंवा तत्सम दृकश्राव्य सामग्री तयार करण्यास बंदी घातली आहे. यासंदर्भातील परिपत्रक उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्या स्वाक्षरीने ४ ऑगस्ट रोजी जारी करण्यात आले आहे.

परिपत्रकानुसार, ड्युटीदरम्यान वैयक्तिक प्रसिद्धीसाठी रील्स व व्हिडिओ तयार केल्याने प्रवासी सेवेसह महामंडळाच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे चालकांनी वाहन चालविताना तसेच कर्मचारी, आगार, बसस्थानके, कार्यालये आणि एसटी बसमध्ये कोणत्याही प्रकारचे रील्स, शॉर्ट्स किंवा लाइव्ह स्ट्रीमिंग करू नये, असे स्पष्ट



निर्देश देण्यात आले आहेत. उल्लखन करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

मात्र महामंडळाच्या प्रवासी सुविधा, लोककल्याणकारी योजना, स्वच्छता आणि रस्ते सुरक्षा अभियानासारख्या सकारात्मक उपक्रमांबाबत महामंडळाचे प्रोत्सान असून अशी सामग्री प्रसारित करण्यापूर्वी सक्षम अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेऊन तयार करता येणार आहे. त्यास परवानगी आहे.

## तिवरे पुलावरून नदीत पडून सोलापूरच्या तरुणाचा मृत्यू

■ **चिपळूण (दै. संध्या)**

चिपळूण तालुक्यातील तिवरे फणसवाडी येथे पुलावर उभे असताना तोल जाऊन नदीपात्रात पडल्याने तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (३१ जुलै) घडली. याबाबत अलोरे पोलिस स्थानकात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

राजवर्धन किरण संगा (वय २०, रा. कन्ना चौक, सोलापूर, सध्या रा. खेर्डी, चिपळूण) असे तरुणाचे नाव आहे. तो ३१ जुलै रोजी सायंकाळी ६:३५ वाजण्याच्या सुमारास मित्र मोहम्मद नासीर अब्दुल रहीम खान याच्यासोबत तिवरे फणसवाडी येथील पुलावर उभा होता. त्याठिकाणी गाडीच्या काचा पुसत असताना अचानक तोल जाऊन तो पुलावरून नदीपात्रात पडला. पाण्याचा प्रवाह वेगवान असल्याने तो प्रवाहासोबत वाहून गेला.

घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली. काही वेळानंतर गंगेचीवाडी, तिवरे परिसरात नदीकाठावरील झाडांमध्ये अडकलेल्या अवस्थेत राजवर्धनचा मृतदेह सापडला. त्याला तातडीने कामथे उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर उपचारापूर्वीच त्याला मृत घोषित केले.



संग्रहित छायाचित्र

## धीरज परदेशी हत्या प्रकरण : 'फास्ट ट्रॅक' कोर्टात खटला चालवणार : मुख्यमंत्र्यांचे आश्वासन



■ **अहिल्यानगर (दै. संध्या)**

महापालिकेचा कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी यांची हत्या करणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडणार नाही. विशेष सरकारी वकील नेमून खटला 'फास्ट ट्रॅक' कोर्टात चालविण्यात येईल. अशा प्रवृत्तींना ठेचल्याशिवाय राहणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोनवरून दिले. त्यानंतर आंदोलन रात्री १० नंतर मागे घेण्यात आले. त्यानंतर मयत धीरज परदेशी यांच्यावर रात्री उशिरा अंत्यविधी करण्यात आला.

मुख्य आरोपीवर कारवाई करावी, तसेच आरोपींच्या घरावर बुलडोझर चालवावा, या प्रमुख मागण्यांसाठी शहरातील जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय चौकात आंदोलकांनी सोमवारी सायंकाळी धरणे धरले होते. आमदार संग्राम जगताप, आमदार गोपीचंद पडळकर, अक्षय कर्डिले, संग्रामबापू भंडारे, दिगंबर गेंट्याल, मयताची आई, वडील आणि बंधू आंदोलनात सहभागी होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी फोनवरून सभेच्या ठिकाणी आंदोलकांशी संवाद साधला.

# बुलेट ट्रेनवरून फलटण विरुद्ध बारामती संघर्षाची शक्यता वाढली?

■ **फलटण (दै. संध्या)**

केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात मुंबई-हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी ६ हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या मार्गाबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. हा प्रकल्प फलटण तालुक्यातील शिंदेवाडी मार्गे जाण्याऐवजी मुंबई-पुणे-बारामती-हैदराबाद असा मार्ग स्वीकारणार असल्याच्या चर्चांना सध्या जोर आला आहे. त्यामुळे फलटण तालुक्याच्या हक्काचा प्रकल्प बारामतीकडे वळविला जाणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. या मुद्द्यावरून बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि माढ्याचे माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्यात पुन्हा राजकीय संघर्षाची शक्यता निर्माण



झाली आहे.

रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रयत्नांना हिरवा कंदील मिळाला होता. माढा लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी मुंबई-हैदराबाद बुलेट ट्रेनचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे मांडला होता. सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांच्या सीमेवरील फलटण तालुक्यातील शिंदेवाडी येथे येऊन हा मार्ग न्यावा आणि येथे बुलेट ट्रेनचे स्थानक उभारावे, अशी त्यांची भूमिका होती. या मागणीसाठी त्यांनी दिल्ली पातळीवर प्रयत्न केले होते. तत्कालीन केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासमोरही हा प्रस्ताव मांडण्यात आला होता. या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचा दावा रणजितसिंह नाईक-निंबाळकर समर्थकांकडून करण्यात आला होता.

रणजितसिंह नाईक-निंबाळकर लोकसभेत नसल्याच्या पार्श्वभूमीवर बुलेट ट्रेनचा मार्ग बारामतीमार्गे नेण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे केंद्र पातळीवर प्रयत्नशील असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे शिंदेवाडीमार्गे जाणाऱ्या प्रस्तावाचे भवितव्य काय, याकडे फलटणकरांचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांची या प्रकल्पाबाबतची भूमिका अद्याप स्पष्टपणे समोर आलेली नाही. शिंदेवाडी येथे स्थानक व्हावे, यासाठी त्यांच्या पातळीवर कोणत्या हालचाली सुरू आहेत, याबाबतही स्थानिक पातळीवर चर्चा सुरू आहे. फलटणच्या हक्काच्या पाणी प्रश्नावरून यापूर्वी सुप्रिया सुळे आणि रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्यात राजकीय संघर्ष झाला होता. नीरा-देवघरच्या पाण्याच्या प्रश्नावरून दोन्ही नेत्यांच्या भूमिका आमनेसामने आल्या होत्या. फलटण तालुक्याचे पाणी बारामतीकडे वळविण्याच्या प्रयत्नांना रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी विरोध केल्याची भूमिका त्यावेळी मांडण्यात आली होती. आता बुलेट ट्रेनच्या मार्गावरूनही दोन्ही नेत्यांच्या राजकीय भूमिका पुन्हा आमनेसामने येणार का, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

### शिंदेवाडी स्थानक झाल्यास विकासाला चालना

शिंदेवाडी येथे बुलेट ट्रेनचे स्थानक झाल्यास फलटण तालुक्यासह सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागाच्या विकासाला मोठी चालना मिळू शकते. त्यामुळे हा प्रकल्प बारामतीमार्गे जाणार की शिंदेवाडीमार्गे, तसेच शिंदेवाडी येथे स्थानक होणार का, याबाबत केंद्र सरकारकडून अधिकृत भूमिका स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘पार्किंग पॉलिसी’ आणि हॉकर्स धोरणा’च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी झोनची पाहणी सुरू

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड शहराच्या वाढत्या नागरीकरणासोबतच वाहतूक व्यवस्था सुरळीत राखणे आणि पदपथ अतिक्रमणमुक्त करणे यावर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने विशेष भर दिला आहे. याच पार्श्वभूमीवर शहरात ‘पार्किंग पॉलिसी’ आणि ‘हॉकर्स धोरण’ प्रभावीपणे राबविण्याच्या हालचालींना प्रत्यक्ष गती मिळाली असून, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली व पुढाकाराने महापालिकेच्या ‘ग’ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध भागांचे प्रत्यक्ष पाहणी दौरे सुरू करण्यात आले आहेत. शहरात दिवसेंदिवस वाढणारी वाहनसंख्या आणि त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी यावर कायमस्वरूपी मात करणे, नागरिकांना चालण्यासाठी सुरक्षित व मोकळे पादचारी मार्ग उपलब्ध करून देणे तसेच फेरीवाल्यांसाठी हॉकर्स झोनची निश्चिती करून त्यांचे योग्य पुनर्वसन करणे, हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. या महत्त्वाकांक्षी धोरणाची अंमलबजावणी कागदावरच न राहता प्रत्यक्षात जमीन स्तरावर कशी राबविता येईल, यासाठी प्रशासकीय यंत्रणा सक्रिय झाली आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणून ‘ग’ क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील अत्यंत वर्दळीच्या समजल्या जाणाऱ्या काळेवाडी फाटा चौक, बी.आर.टी. मार्ग तसेच थेरगाव परिसरातील विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान स्थानिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. भविष्यात वाहनचालक, व्यावसायिक आणि पादचाऱ्यांना कोणतीही गैरसोय होणार नाही, यादृष्टीने योग्य जागांची निश्चिती करण्याबाबत व वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. या पाहणी व आढावा दौऱ्यावेळी ‘ग’ क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त मुकेश कोळप, स्वीकृत नगरसेवक संदीपभाऊ गाडे तसेच महापालिकेचे संबंधित विभागप्रमुख व अधिकारी वर्ग उपस्थित होता. शहराचे नियोजनबद्ध, सुव्यवस्थित आणि शिस्तबद्ध रस्ते हेच शहर विकासाचे खरे प्रतीक असते, असे मत अभिषेक बारणे यांनी यावेळी व्यक्त केले. प्रशासनाकडून राबविण्यात येत असलेल्या या लोकहिताच्या मोहिमेला पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांचे आणि व्यावसायिकांचे पूर्ण सहकार्य लाभेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. “पिंपरी-चिंचवड शहराचा सुनियोजित विकास करणे आणि नागरिकांना वाहतुकीची कोणतीही अडचण भासू नये, यासाठी ‘पार्किंग पॉलिसी’ आणि ‘हॉकर्स धोरण’ अत्यंत गांभीर्याने आणि प्रभावीपणे राबवले जात आहे. या धोरणांमुळे शहरातील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होईलच, सोबतच पादचाऱ्यांसाठी सुरक्षित रस्ते आणि फेरीवाल्यांना हक्काचे व योग्य पुनर्वसन मिळेल. ही केवळ प्रशासकीय मोहीम नसून शहराला शिस्त लावणारा महत्त्वाचा निर्णय आहे. यासाठी सर्व नागरिकांनी आणि व्यावसायिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करतो.”



### पाच हजारांचा हप्ता देण्यास नकार दिल्याने भाजी विक्रेत्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण

**पिंपरी : दैनिक संध्या**

दरमहा पाच हजार रुपयांचा हप्ता देण्यास नकार दिल्याने भाजी विक्रेत्याला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण करण्यात आली. तसेच, त्याला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. ही घटना शनिवारी (दि. ८) रात्री साडेआठच्या सुमारास आळंदीतील ज्ञानसागर मंगल कार्यालयाजवळ घडली. सिद्धार्थ भीमराव डबडे (६०, रा. ज्ञानसागर मंगल कार्यालयाजवळ, वडगाव रोड, आळंदी) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, हरिओम गणेश पांचाळ (रा. वडगाव रोड, आळंदी, ता. खेड, जि. पुणे) आणि त्याच्यासोबत असलेल्या एका अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हरिओम पांचाळ आणि त्याचा साथीदार फिर्यादी यांच्या भाजीपाल्याच्या गाड्यावर आले. त्यांनी फिर्यादीकडे दरमहा पाच हजार रुपये हप्त्याची मागणी केली. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच, बाजूला पडलेल्या दगडाने मारहाण करून जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी रविवारी (दि. ९) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तळेगावचा आठवडे बाजार रात्री ८ वाजताच बंद; उशीर केल्यास माल जप्त करण्याचा इशारा

**तळेगाव दाभाडे: दैनिक संध्या**

रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या आठवडे बाजारावर अंकुश ठेवण्यासाठी रात्री आठची वेळ सुनिश्चित करण्यात आली आहे. रात्री आठ वाजता बाजार बंद करण्यात यावा; अन्यथा व्यापाऱ्यांचा माल जप्त करण्यात येईल, अशा सूचना व्यापारी व किरकोळ विक्रेत्यांना तळेगाव नगर परिषदेकडून करण्यात आल्या आहे. शहराचा ऐतिहासिक आठवडे बाजार अनेक समस्येगर्तेत सापडला आहे. गेल्या काही वर्षात बाजाराचे विस्तारलेले स्वरूप व त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. बाजाराच्या स्वच्छतेचा विषय हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असून, नगराध्यक्ष संतोष दाभाडे पाटील, मुख्याधिकारी गिरीश दापकेकर, स्वच्छता वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीचे सभापती निखिल भगत यांच्या सूचना व मार्गदर्शनाने काही नियम बनवण्यात आले आहेत. या नियमावलीनुसार रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या बाजारावर अंकुश ठेवण्यासाठी रात्री आठची वेळ सुनिश्चित करण्यात आली आहे. तसेच, नागरिकांनी आठच्या आधी बाजारासाठी यावे, आठनंतर त्यांना भाजीपाला व अन्य वस्तू मिळणार नाहीत याची दखल घ्यावी, असे आवाहन संतोष दाभाडे पाटील यांनी केले आहे. रविवारच्या बाजाराच्या दिवशी नगराध्यक्ष संतोष दाभाडे पाटील, निखिल भगत, विरोधी पक्षनेते संतोष भेगडे, नगरसेवक इंदरकुमार ओसवाल, सूरज सातकर वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक प्रशांत शिवणे, स्वच्छता निरीक्षक सुनील काळकुटे, दत्तात्रय ढवळे, यांनी बाजारात जाऊन प्रत्येक व्यापाऱ्याला सूचना दिल्या आहेत.

## परंपरागत कामगार कायदे लागू करा : कदम

**कामगार संघटना संयुक्त कृती समिती च्या वतीने जेलभरो आंदोलन**

■ पिंपरी (दै. संध्या)



केंद्र सरकारने व एक जून पासून राज्य सरकारने देखील नवीन कामगार कायदे लागू केले आहेत. हे चार नवीन कामगार कायदे संघटित व असंघटित कामगारांचे आर्थिक आणि सामाजिक शोषण करणारे आहेत. यामुळे निवडक उद्योगपती, भांडवलदारांचे आर्थिक हित साध्य होईल. देशातील कष्टकरी कामगार महागाई आणि गुलामीत लोटला जाईल. या नवीन कायद्यांमुळे बेरोजगारी मध्ये वाढ होईल. सर्व कामगारांचे आर्थिक स्थैर्य संपुष्टात येऊन सामाजिक आणि कौटुंबिक स्वास्थ्य धोक्यात येईल. यामुळे हे कामगार कायदे कायमस्वरूपी रद्द करून जुने परंपरागत कामगार कायदे लागू करावेत अशी मागणी कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे पुणे जिल्हा अध्यक्ष आणि इंटकचे प्रदेशाध्यक्ष कैलास कदम यांनी केली.

सोमवारी, देशातील देशव्यापी कामगार संघटनांनी दिल्ली दिल्लीसह प्रमुख शहरांमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात जेलभरो आंदोलन केले. त्या अंतर्गत पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक येथे कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी आयटक चे अनिल रोहम, सीटू चे गणेश दराडे, दिलीप पवार, राजेंद्र खराडे, शशिकांत धुमाळ, विजय जाधव, भारतीताई घाग, यशवंत सुपेकर, शांताराम कदम तसेच इंटक, आयटक, सीआयटीयू, एआयसीसीटीयु, एचएमएस, एनटीयूआय, बीकेएसएम, टीयुसीआय, बीयुसीटीयु, एआयबीइए, बीइएफआय, एआयआयइए, श्रमिक एकता महासंघ, राज्य कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघ, स्वतंत्र फेडरेशन, योजना कर्मचारी, आशा, अंगणवाडी आणि घर कामगार संघटना, पीएमपीएल कामगार संघटना, एमएसइबी कामगार संघटना व इतर कामगार संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. आंदोलनानंतर पोलिसांनी कामगारांना अटक केली. यावेळी कैलास कदम यांनी मागणी केली की, सर्व क्षेत्रातील कामगारांना किमान वेतन द्यावे व त्यामध्ये महागाई निर्देशांकनुसार वाढ करावी."मनरेगा" पुन्हा सुरू करून वार्षिक किमान २०० दिवस रोजगार आणि किमान ७०० रुपये प्रतिदिन मजुरी द्यावी. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सुरू असणारे खाजगीकरण थांबवावे. भारत अमेरिका मुक्त व्यापार करार रद्द करून कृषी उत्पादनांना किमान आधारभूत किंमत द्यावी. वीज क्षेत्राचे खाजगीकरण रद्द करून स्मार्ट मीटर योजना ताबडतोब थांबवावी. जुनी पेन्शन योजना लागू करावी. वृद्ध व्यक्तींना किमान ४००० रुपये मासिक निवृत्ती वेतन मिळावे. घर कामगारांना किमान वेतन, सामाजिक सुरक्षा, साप्ताहिक सुट्टी, सशुल्क रजा आणि पेन्शन मिळावी व त्यांना कामगार म्हणून कायदेशीर मान्यता व संरक्षण द्यावे. गोरगरिबांना शिक्षण घेता यावे यासाठी अर्थसंकल्पात भरघोस वाढ करून तरतूद करावी. शैक्षणिक क्षेत्राचे खाजगीकरण आणि अनागोंदी थांबून पेपर फुटीची जबाबदारी निश्चित करावी. अशा विविध मागण्यांचे निवेदन कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने देण्यात आले. तसेच दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्ज चा देखील यावेळी निषेध करण्यात आला.

## शून्य कचरा पर्व’ला पिंपरी-चिंचवडमध्ये प्रारंभ

■ पिंपरी (दै. संध्या)

स्वातंत्र्यदिनानिमित्त आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे प्रथम नागरिक, महापौर रवि लांडगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शहरात ‘शून्य कचरा पर्व’ या अभिनव उपक्रमाला उत्साहात सुरुवात करण्यात आली. आचार्य अत्रे रंगमंदीर येथे आयोजित कार्यक्रमात उपमहापौर शर्मिला बाबर आणि माजी नगरसदस्या डॉ. श्रद्धा लांडगे यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी मागील वर्षभरात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या इंग्लिश मीडियम स्कूल, भोसरी येथे राबविण्यात आलेल्या ‘शून्य कचरा शाळा’ उपक्रमात उल्लेखनीय योगदान देणारे विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच महानगरपालिका स्वच्छता कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच ‘शून्य कचरा आदर्श शाळा पुरस्कार-२०२६’ इंग्लिश मीडियम स्कूल, भोसरीला प्रदान करण्यात आला.

इंग्लिश मीडियम स्कूल, भोसरी येथे शून्य कचरा व्यवस्थापनाचे आदर्श मॉडेल विकसित करण्यात आले असून, शाळेत निर्माण होणाऱ्या ओला, सुका व घातक कचऱ्याचे शास्त्रीय वर्गीकरण, स्वतंत्र डस्टबिनची द१व्यवस्था, पुनर्वापर आणि पुनर्चक्रण यावर विशेष भर देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग वाढविण्यासाठी प्रत्येक वर्गातून एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी यांची ‘शून्य कचरा क्लास मॉनिटर’ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**ही पुनर्वापराची गाडी**

‘ही कचरा गाडी नाही, ही पुनर्वापराची गाडी आहे’ हा सकारात्मक संदेश विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न यामाध्यमातून करण्यात येत आहे. या अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना, विद्यार्थ्यांना स्वच्छतेसाठी सातत्याने योगदान देणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना आणि पालकांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. ‘शून्य कचरा पर्व’ केवळ महानगरपालिकेच्या शाळांपुरते मर्यादित न ठेवता भविष्यात खासगी शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, ज्येष्ठ नागरिक संघटना तसेच शहरातील नागरिकांचा व्यापक सहभाग वाढविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. त्याचबरोबर प्रत्येक शनिवारी शून्य कचरा अभियान राबविणे आणि विद्यार्थ्यांकडून शून्य कचऱ्याची स्वप्रतिज्ञा घेण्याचा निर्णयही घेण्यात आला. ‘ही कचरा गाडी नाही, ही पुनर्वापराची गाडी आहे’ हा सकारात्मक संदेश विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न यामाध्यमातून करण्यात येत आहे.

## विकासकामांचा अहवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सादर

■ पिंपरी (दै. संध्या)

मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी मतदारसंघातील विकासकामांचा बारावा वार्षिक अहवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोमवारी भेट घेऊन त्यांना सादर केला. या भेटीदरम्यान मतदारसंघातील विविध प्रलंबित व पूर्ण झालेल्या विकासकामांवर सविस्तर चर्चा झाली. हा अहवाल ई-बुकमध्ये तयार करून सोशल मीडियावर प्रसिद्ध करावा. सोशल मीडियाच्या वापराचा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खासदार बारणे यांना दिला.

खासदार श्रीरंग बारणे यांची ही तिसरी टर्म आहे. खासदार बारणे वर्षभरात केलेल्या कामांचा अहवाल दरवर्षी काढतात. तिसऱ्या टर्ममधील दुसरा आणि आतापर्यंतचा बारावा अहवाल आहे. हा अहवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सादर केला. अहवाल स्वीकारताना पंतप्रधानांनी दरवर्षी अहवाल प्रसिद्ध करण्याच्या या उपक्रमाचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. विकासकामे अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करण्याचा महत्त्वपूर्ण सल्ला दिला.

विकासकामांचा अहवाल ‘ई-बुक’ (E-book) स्वरूपात तयार करून तो सोशल मीडियावर प्रसिद्ध करावा, जेणेकरून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत ही माहिती सहज पोहोचू शकेल. सुमारे २६ लाख एवढी मोठी लोकसंख्या असलेल्या मतदारसंघात प्रत्येक नागरिकाशी थेट संपर्क ठेवणे कठीण असते. अशा वेळी सोशल मीडिया व कार्यकर्त्यांच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारच्या योजना आणि विकासकामे जनतेपर्यंत पोहोचवणे सुलभ होते.

## कचरा प्रक्रिया आणि पुनर्वापराला मिळणार गती

■ पिंपरी (दै. संध्या)

स्वच्छ सर्वेक्षण २०२६ च्या पार्श्वभूमीवर कचरा विलगीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात गृहभेटी देऊन नागरिकांना चार-बिन कचरा विलगीकरणाबाबत माहिती देण्यात येत आहे.

घरातून निर्माण होणारा ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजी योग्य कचरा स्वतंत्रपणे ठेवून संबंधित घंटागाडीमध्ये देण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात येत आहे. कचरा उघड्यावर टाकणे टाळावे, तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता निर्माण करू नये, याबाबतही नागरिकांचे प्रबोधन करण्यात येत आहे.

“कचरा व्यवस्थापनाच्या संपूर्ण प्रक्रियेत कचऱ्याचे विलगीकरण हा महत्त्वाचा टप्पा आहे. घरातूनच कचरा स्वतंत्र केल्यास त्याची पुढील प्रक्रिया अधिक सुलभ आणि शास्त्रीय पद्धतीने करता येते. त्यामुळे नागरिकांनी चार-बिन पद्धतीचा अवलंब करून महापालिकेस सहकार्य करावे,” असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

“कचरा विलगीकरणाची सवय प्रत्येक कुटुंबात रुजणे आवश्यक आहे. त्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून जनजागृती करण्यात येत आहे. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण झाल्यास त्याचा पुनर्वापर आणि प्रक्रिया अधिक परिणामकारकपणे करता येईल,” असे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले.

## मृतांच्या कुटुंबीयांना कंपनीकडून ४० लाखांची मदत

■ पिंपरी (दै. संध्या)



मोशी कचरा डेपो परिसरातील भीषण दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी संबंधित कंपनीकडून मोठी मदत जाहीर करण्यात आली आहे. प्रत्येक मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांना ४० लाख रुपयांची आर्थिक मदत, तसेच त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी, कुटुंबातील पात्र व्यक्तीला नोकरी आणि आरोग्य विमा देण्याची घोषणा कंपनीच्या वतीने करण्यात आली.

याबाबत आज पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, ‘क’ क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे, नगरसेवक सचिन तापकीर, नगरसेविका सारिका गायकवाड, कंपनीचे एचआर प्रतिनिधी तसेच दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते. मोशी येथील कचरा डेपो परिसरात ८ जुलै रोजी कचऱ्याचा मोठा ढिगारा वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली होती. या दुर्घटनेत एकूण ९ कर्मचाऱ्यांचा मृत्यू, तर १४ जण जखमी झाले होते.

बचाव पथकाने तब्बल ८४ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर ढिगाऱ्याखाली अडकलेल्या सर्वांचा शोध पूर्ण केला. दुर्घटनेनंतर मृतांच्या कुटुंबीयांना मदत मिळावी यासाठी विविध स्तरांवरून मागण्या करण्यात आल्या होत्या. पिंपरी-चिंचवड महापालिकेनेही मृतांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आणि राज्य सरकारने प्रत्येकी पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला होता. आता कंपनीकडून जाहीर करण्यात आलेल्या ४० लाख रुपयांच्या मदतीसोबतच पाल्यांचे शिक्षण, कुटुंबातील पात्र व्यक्तीला रोजगार आणि आरोग्य विम्याचे संरक्षण देण्याच्या निर्णयामुळे दुर्घटनेत उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांना काहीसा आधार मिळणार आहे.

## पिंपरी-चिंचवड गणेशोत्सव मंडळांचे पुरस्कार जाहीर


**भोसरीतील कै. दामूशेठ गव्हाणे मित्र मंडळ प्रथम, तर पिंपरी गाव येथील सुवर्णयुग मित्र मंडळाचा द्वितीय क्रमांक**

■ पिंपरी (दै. संध्या)

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आयोजित पिंपरी-चिंचवड शहरातील गणेशोत्सव मंडळांच्या स्पर्धेचे निकाल जाहीर करण्यात आले असून, भोसरी येथील कै. दामूशेठ गव्हाणे मित्र मंडळाने प्रथम क्रमांक पटकावत मानाचा बहुमान मिळवला आहे. तर पिंपरी गावातील सुवर्णयुग मित्र मंडळाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

या पत्रकार परिषदेत श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष डॉ. रामचंद्र परांजपे, माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सवप्रमुख अक्षय गोडसे, तसेच विश्वस्त कुमार वांबुरे, मुरलीधर लोंढे आणि उत्तमराव गावडे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत शहरातील तब्बल २९५ गणेशोत्सव मंडळांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी १२३ मंडळे बक्षीसपात्र ठरली असून सात मंडळांना सन्मानपत्र देण्यात आले आहे. तसेच १४ शाळांनी सहभाग घेतला होता, त्यातील सात शाळांना पुरस्कार मिळाले आहेत. शहरातील २५ गृहनिर्माण सोसायट्यांनीही स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यापैकी ११ सोसायट्यांना बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. या स्पर्धेसाठी एकूण १४ लाख २० हजार रुपयांची बक्षिसे देण्यात आली आहेत. प्रमुख विजेते मंडळ.. प्रथम क्रमांक : कै. दामूशेठ गव्हाणे मित्र मंडळ, भोसरी – ₹५१,००० द्वितीय क्रमांक : सुवर्णयुग मित्र मंडळ, पिंपरी गाव – ₹४५,००० तृतीय क्रमांक : समस्त गव्हाणे तालीम, भोसरी – ₹३५,००० चतुर्थ क्रमांक : छत्रपती शिवाजी महाराज मित्र मंडळ, पिंपळे गुरव – ₹३०,००० पंचम क्रमांक : समता मित्र मंडळ, काळभोर नगर, आकुर्डी – ₹२५,००० या स्पर्धेअंतर्गत शहरातील सात गणेश मंडळांना ‘जय गणेश भूषण पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. यामध्ये जय बजरंग तरुण मंडळ (पवळे उड्डाणपूल, निगडी), जय हिंद मित्र मंडळ ट्रस्ट (प्राधिकरण, निगडी), लांडगे लिंबाची तालीम मंडळ (भोसरी गावठाण), पठारे-लांडगे तालीम मित्र मंडळ (भोसरी), गांधी पेठ तालीम मित्र मंडळ (चिंचवड), एस.के.एफ. मित्र मंडळ (चिंचवड) आणि राष्ट्रतेज तरुण मंडळ (काळभोर नगर) यांचा समावेश आहे.





## थोडक्यात पण महत्वाचे



### अदानी हटवा'च्या घोषणांनी आदिवासी परिसर दणाणला

नारायणगाव : दैनिक संध्या

क्रांतिदिन आणि जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागात आयोजित कार्यक्रमात 'अदानी हटवा'चा नारा देण्यात आला. अंजनावळे येथील प्रस्तावित १५०० मेगावॅटच्या पंप्ड स्टोरेज प्रकल्पाला स्थानिक आदिवासी बांधवांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी 'सह्याद्री वाचवा, अदानी हटवा' असे फलक लावून आणि घोषणाबाजी करून आंदोलकांनी आपला तीव्र संताप व्यक्त केला. या प्रकल्पाबाबत माजी आमदार अतुल बेनके यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. कोणतीही परिस्थिती उद्भवली तरी आदिवासी बांधवांच्या संमतीशिवाय हा प्रकल्प येथे होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने २१ ऑगस्ट रोजी आयोजित केलेली जनसुनावणी रद्द करण्याची मागणी त्यांनी केली आहे. दुसरीकडे, आमदार शरद सोनवणे यांनी स्पष्ट केले की, २०२२ मध्येच या प्रकल्पाला मंजुरी मिळाली असून, यापूर्वीही त्यांनी याला लेखी विरोध दर्शवला होता. २१ ऑगस्टच्या जनसुनावणीपूर्वी जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार व सर्व लोकप्रतिनिधी आणि स्थानिक नागरिकांची संयुक्त बैठक घेऊन पुढील भूमिका निश्चित केली जाईल, असे त्यांनी सांगितले. अदानी रिन्युएबल एनर्जी कंपनीकडून जुन्नर तालुक्यातील अंजनावळे गावाच्या हद्दीत सुमारे ७,०४८ कोटी रुपये खर्चाचा १,५०० मेगावॅट क्षमतेचा 'पंप्ड स्ट्रोरेज' प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे आदिवासी भागात तीव्र असंतोष पसरला असून २१ ऑगस्टच्या जनसुनावणीपूर्वी जनमानसात आंदोलनाचे मोठे वादळ निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, या प्रकल्पाविरोधात सामाजिक कार्यकर्ते सुरज वाजगे यांनी जुन्नर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक चौकात उपोषण सुरू केले असून, जनसुनावणी रद्द होईपर्यंत हे आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

### चिंचोली ग्रामपंचायतीला 'आदिशक्ती पुरस्कार' जाहीर

नारायणगाव : दैनिक संध्या

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने सन २०२५-२६ चा प्रतिष्ठित 'आदिशक्ती पुरस्कार' नुकताच जाहीर करण्यात आला आहे. महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक विकासासाठी राबविण्यात आलेल्या या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करत जुन्नर तालुक्यातील चिंचोली ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक पटकावला आहे. महिला सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना हा आदिशक्ती विशेष पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या अभियानांतर्गत तालुक्यातील इतर ग्रामपंचायतींनीही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यामध्ये धालेवाडी तर्फे मिन्हेर ग्रामपंचायतीने द्वितीय क्रमांक, तर काटेडे ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक मिळवला आहे. चिंचोली ग्रामपंचायतीच्या या ऐतिहासिक यशात जुन्नर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रतीक चन्नावर, ग्रामविकास अधिकारी अर्चना केदारी, विद्या बांबळे, सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर, ऑपरेटर प्रतीक काशीद यांच्यासह सर्व पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच ग्रामपंचायतीला हा बहुमान मिळाला असल्याचे बोलले जात आहे.



### पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते काशिनाथ आल्हाट यांना कलारत्न पुरस्कार

नारायणगाव : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयोजित साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंतीच्या निमित्ताने तमाशा अभ्यासक काशिनाथ आल्हाट यांना कलारत्न पुरस्काराने पद्मश्री गिरीश प्रभुणे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती सोहळ्याचे निमित्ताने कलारत्न पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या जयंती सोहळ्याच्या सांगता समारंभात पद्मश्री गिरीश प्रभुणे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर, नगरसेविका अनुराधाताई गोरखे, कामगार नेते इरफान भाई सय्यद, जयंती समिती अध्यक्ष गणेश अवघडे यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ नेते भाऊसाहेब आढागळे, ज्येष्ठ नेते संदिपानजी झोंबाडे, नितीन घोलप, ससाने, तोरडमल, चव्हाण, हे सर्व आजी, माजी, जयंती सोहळ्याचे अध्यक्ष व नगरसेवक आणि महानगरपालिकेचे सर्व अधिकारी वर्ग उपस्थित होता. काशिनाथ आल्हाट हे सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात गेली 38 वर्ष हे कार्यरत आहेत. ज्ञानदानाच्या पवित्रक्षेत्राबरोबरच समाजकार्याचे अखंड वृत्त त्यांनी धारण करून लोककलावंतांना न्याय देण्यासाठी राज्य पुरस्कार प्राप्त हलगी सम्राट केरबा पाटील ही संस्था स्थापन करून लोक कलावंतांच्या हिताचे अनेक उपक्रम त्यांनी राबवले आहेत. तसेच ते तमाशा अभ्यासक उत्तम निवेदक आहेत. त्यांच्या कार्याची यापूर्वी महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महाराष्ट्र शासन समाजभूषण पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते.

### 'आदर्श माता शेवराई वस्ती' नामफलकाचे उद्घाटन

कोरेगावमुळ,: दैनिक संध्या

आदिवासी दिनानिमित्त कासारी गावातील गणपती माळ येथील पारधी वस्तीला 'आदर्श माता शेवराई वस्ती' या नामफलकाचे उद्घाटन उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमाला पुणे जिल्ह्यातील हजारो आदिवासी बांधव तसेच महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. पारंपरिक संस्कृतीचे जतन, सामाजिक एकजूट आणि आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर या वेळी चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक तथा अखिल भारतीय आदिम महासंघ, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष नामदेव भोसले उपस्थित होते. यावेळी बोलताना भोसले म्हणाले, 'स्वातंत्र्याला ७९ वर्षे उलटूनही पश्चिम महाराष्ट्रातील फासेपारधी, भिल्ल, कातकरी यांसह अनेक आदिवासी समाज आजही शासनाच्या विविध सवलती आणि मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत.



# शिवशक्ती नागरी सहकारी पतसंस्था जुन्नरचा एन. पी. ए. शुन्य टक्के

■ जुन्नर (दै. संध्या)




स्वर्गीय कॅप्टन भाईसाहेब पुरवंत यांनी स्थापन केलेल्या जुन्नर येथील शिवशक्ती नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित जुन्नरची ३७ वी वार्षिक सर्व साधारण सभा शनिवार दिनांक ८ ऑगस्ट २०२६ रोजी बहुसंख्य सभासदांच्या उपस्थितीत अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेच्या अध्यक्षा श्रीमती उर्मिला विलास पुरवंत होत्या.

शिवशक्ती नागरी सहकारी पतसंस्थेच्या सदाबाजार पेठ, जुन्नर, धान्यबाजार पेठ जुन्नर व माणिक चौक, चाकण अशा तीन शाखा स्वमालकीच्या इमारतीत कार्यरत आहेत. पतसंस्थेचे दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर वसुल भाग भांडवल ३ कोटी ०५ लाख, ठेवी ८० कोटी व कर्ज वाटप ६५ कोटी असून या आर्थिक वर्षात संस्थेने सुमारे ३६५ कोटींचा व्यवसाय केला असून संस्थेस १ कोटी ८० लाखचा निव्वळ नफा झालेला आहे याबाबतची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष . डॉ. अजित वल्हवणकर यांनी दिली. संस्थेने सर्व शासकीय तरतुदी केल्या असुन मा. कार्यकारी मंडळाने पतसंस्थेच्या सभासदांना १५% प्रमाणे लाभांश वाटपास वार्षिक सभेने मान्यता दिलेली आहे संस्थेचा नेट एन. पी. ए. शुन्य टक्के झालेला आहे असे संस्थेचे सेक्रेटरी ॲड. समिर पुरवंत यांनी सांगितले. पतसंस्थेचे खजिनदार. पंकज रासने यांनी सभेच्या सुरवातीला शोक प्रस्ताव सादर केला . त्यानंतर पतसस्थेच्या प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. कल्पना यंदे यांनी मागील सभेचा इतिवृत्तांत सादर केला. वार्षिक सभेचे कामकाज पतसंस्थेचे आर्थिक मानद सल्लागार दिपक खत्री यांनी पाहिले.सदर प्रसंगी मा. सभासदांकरीता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये . डॉ. प्रशांत खोप्टीकर, निवृत्त व्यवस्थापक, लातुर अर्बन बँक, अहिल्यानगर यांनी मार्गदर्शन केले. वार्षिक सभा प्रसंगी पतसंस्थेचे सभासद, कार्यकारी मंडळ सदस्य, सल्लागार मंडळ सदस्य, कायदे विषयक सल्लागार, व्हॅल्युएटर्स, सेवक वर्ग व ठेव प्रतिनिधी उपस्थित होते. वार्षिक सभा प्रसंगी पतसंस्थेच्या कार्याबाबत व प्रगती बाबत विलास पानसरे, . सुहास शेटे, लक्ष्मण थोरात, राजेंद्र ताम्हाणे, डॉ. सौ. स्वाती साखरे - पुरवंत, ॲड. सुधीर ढोबळे, डॉ. सुनिल शेवाळे व डॉ. अजित वल्हवणकर यांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर पतसंस्थेचे संचालक चेतन शहा यांनी आभार प्रदर्शन केले.

# पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प मूळ जुन्या मार्गानेच व्हावा

**या मागणी संदर्भात जातीने लक्ष घालण्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना दिले**



■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

कोरेगावमुळ,(दै.संध्या):- जगातील १९ देशांमध्ये रेडिओ क्वाएट झोनच्या परिसरात सुरू असलेल्या प्रवासी तसेच मालवाहतूक रेल्वेच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प मूळ जुन्या मार्गानेच व्हावा या मागणी संदर्भात जातीने लक्ष घालण्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना दिले. याखेरीज महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासह अण्णा भाऊ साठे आणि तुकडोजी महाराज यांना भारतरत्न जाहीर करण्याची मागणी डॉ. कोल्हे यांनी केली. आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदारांनी पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली. या भेटीत खासदार डॉ. कोल्हे यांनी शिरूर लोकसभा मतदारसंघातील विविध विषयांवर पंतप्रधान मोदी यांच्याशी चर्चा केली, त्यावेळी त्यांनी हे आश्वासन दिले.

शिरूर लोकसभा मतदारसंघातील जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरुर या तालुक्यात बिबट्यांच्या मानवी वस्तीत वावर वाढला असून आजवर अनेक ग्रामस्थांचा विशेषतः लहान मुलांचा बळी गेल्याकडे पंतप्रधानांचे लक्ष वेधून खासदार डॉ. कोल्हे यांनी बिबट हा प्राणी शेड्युल १ मधून वगळून त्याचा समावेश शेड्युल २ मध्ये करावा या मागणीचे निवेदन दिले. त्याचबरोबर इंद्रायणी मेडिसिटी हा महत्वाकांक्षी आरोग्य प्रकल्प उभारण्याची घोषणा तत्कालिन उपमुख्यमंत्री कै. अजितदादा पवार यांनी राज्याच्या विधानसभेत केली होती. मात्र त्यानंतर ४ वर्षांचा काळ लोटला तरी अद्याप हा प्रकल्प प्रलंबित असल्याचे सांगत पंतप्रधान मोदी यांच्याकडे इंद्रायणी मेडिसिटीला चालना देण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश देण्याची मागणी केली. या दोन्ही महत्त्वाच्या विषय पंतप्रधानांनी समजून घेत आवश्यक ती पावले उचलण्याचे आश्वासन दिले. शिरूर लोकसभा मतदारसंघात आदिवासी बहुल क्षेत्र मोठ्या प्रमाणावर असून जुन्नर, खेड आणि आंबेगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र भीमाशंकरच्या परिसरात अनेक दुर्मिळ औषधी वनस्पती असून या वनस्पतींचे जतन व्हावे आणि त्यावर संशोधन व्हावे यासाठी राष्ट्रीय वनौषधी संशोधन केंद्र जुन्नर येथे व्हावे यासाठी तत्कालिन केंद्रीय आयुषमंत्री श्रीपाद नाईक यांनी दिलेल्या सूचनेनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत पाठविलेल्या प्रस्तावावर अद्याप काहीच कार्यवाही होत नसल्याकडे खासदार डॉ. कोल्हे यांनी लक्ष वेधले. त्यांनी हा विषय आस्थेने समजून घेत लक्ष घालण्याचे आश्वासन दिले. खासदार डॉ. कोल्हे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या शिवनेरी गडाच्या पायथ्याशी 'शिवसंस्कार सृष्टी' उभारण्यासाठी आपण गेल्या ६-७ वर्षांपासून पाठपुरावा करीत असल्याचे सांगून ही शिवसंस्कार सृष्टी' उभारल्यास पर्यटनाला चालना मिळेल आणि त्यातून स्थानिक तरुणांना विविध माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

#### प्रकल्पांबाबतची माहिती आस्थेने समजून घेतली

या उद्योगांना मालवाहतुकीसाठी स्वस्त आणि विश्वासार्ह पर्याय म्हणून पीएम गतीशक्ती योजनेंतर्गत थेट न्हावाशेवा बंदराला जोडण्यासाठी उरण, तळेगाव, चाकण, संभाजीनगर असा नवीन रेल्वे (Dadicated freight corridor) उभारण्यात यावा अशी मागणीही केली. पंतप्रधान मोदी यांनी शिरूर लोकसभा मतदारसंघातील सर्वच प्रकल्पांबाबतची माहिती आस्थेने समजून घेतली आणि या सर्व विषयात जातीने लक्ष घालण्याचे तसेच महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासह अण्णा भाऊ साठे आणि तुकडोजी महाराज यांना भारतरत्न जाहीर करण्याबाबतही लक्ष घालण्याचे आश्वासन खासदार डॉ. कोल्हे यांना दिले. यावेळी शिरूर लोकसभा मतदारसंघातील सर्व विषय आस्थेने समजून घेतल्याबद्दल खासदार डॉ. कोल्हे यांनी पंतप्रधानांचे आभार मानले.

# विचारांची ज्योत तेवत ठेवणारा 'सनशाईन सॅटर्डे क्लब'

■ शिरूर (दै. संध्या)

शहराचा विकास केवळ भौतिक सुविधांमुळे होत नाही, तर समाजातील वैचारिक देवाणघेवाण, सकारात्मक संवाद आणि विविध क्षेत्रांतील अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन यामुळेही शहराची सामाजिक व सांस्कृतिक समृद्धी घडत असते. याच विचारातून शिरूरमध्ये गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेला 'सनशाईन सॅटर्डे क्लब' हा उपक्रम आता शहरातील एक महत्त्वाचा वैचारिक संवादमंच म्हणून ओळख निर्माण करीत आहे.

माजी सनदी अधिकारी किशोरराजे निंबाळकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातून ऑगस्ट २०२४ मध्ये या उपक्रमाची सुरुवात झाली. सुरुवातीला समान विचारांच्या व्यक्तींच्या भेटीगाठींपासून सुरू झालेला हा प्रवास आज समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांना एका व्यासपीठावर आणणाऱ्या व्यापक वैचारिक चळवळीत विकसित झाला आहे. येत्या १५ ऑगस्ट २०२६ रोजी क्लबचा द्वितीय वर्धापनदिन साजरा होत आहे.

डिजिटल युगात माहितीचा प्रचंड स्फोट झाला असला, तरी प्रत्यक्ष भेटून संवाद साधण्याची आणि विचारांची देवाणघेवाण करण्याची संस्कृती कमी होत चालली आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी विविध क्षेत्रांतील मान्यवरांना एकत्र आणत मुक्त, सकारात्मक आणि विधायक संवाद घडवून आणण्याचे काम क्लबच्या माध्यमातून केले जाते.

या व्यासपीठावर उद्योजक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, अभियंते, साहित्यिक, कलाकार, खेळाडू, शेतकरी तसेच सामाजिक कार्यकर्ते सहभागी होत आहेत.

केवळ व्याख्यानापुरता मर्यादित न राहता अनुभवांची देवाणघेवाण, प्रश्नोत्तरे, मुक्त संवाद आणि नव्या विचारांचा शोध या माध्यमातून प्रत्येक कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो.

#### मान्यवरांचा उपस्थितांशी संवाद

गेल्या दोन वर्षांत या मंचावर संयुक्त राष्ट्रसंघात अधिकारी म्हणून कार्य केलेले डॉ. शिरीष रावण, माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य व माजी जिल्हाधिकारी डॉ. दिलीप पांढरपट्टे, 'वेंगुर्ला पॅटर्न'चे जनक रामदास कोकरे, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक दत्तात्रय वारे, असीम फाऊंडेशनचे अध्यक्ष सारंग गोसावी, पर्यावरण अभ्यासक अभिजित घोरपडे, डेप्युटी कमिशनर व लेखक राजीव नंदकर, उद्योजक एन. बी. धुमाळ, साहित्यिक डॉ. शाळीग्राम भंडारी, इतिहास अभ्यासक डॉ. पद्माकर प्रभुणे, प्रा. नरेश बोडखे, ॲड. अशोक पलांडे, साहित्यिक संजय कळमकर, माजी सनदी अधिकारी जीवन सोनवणे, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. चारुदत्त कुलकर्णी, शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य नंदकुमार निकम, सीए चकोर गांधी, लेखक व मानसोपचार तज्ज्ञ डॉ. दत्ता कोहीनकर, कर्नल साहेबराव शेळके, कंपनी सेक्रेटरी पवन चरेजा, प्रिया लंघे, सुहास फडके आणि डॉ. राजेश दाते यांसारख्या मान्यवरांनी उपस्थितांशी संवाद साधला आहे. या मान्यवरांच्या अनुभवातून उपस्थितांना विविध क्षेत्रांतील वास्तव, आव्हाने, संधी आणि सकारात्मक दृष्टिकोन समजून घेण्याची संधी मिळाली. त्यामुळे क्लबचे प्रत्येक सत्र हे केवळ कार्यक्रम न राहता ज्ञान, अनुभव आणि विचारांची मेजवानी ठरत आहे. द्वितीय वर्धापनदिनानिमित्तही क्लबने वैचारिक मेजवानीचे आयोजन केले आहे.

# गाडगे महाराज विद्यालयात गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप

■ ओतूर (दै. संध्या)



गाडगे महाराज विद्यालयातील गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद पुणे यांच्या सीएसआर फंडातून तसेच जिल्हा परिषद सदस्य डॉ. छाया तांबे आणि स्वर्गीय वैभव दादा प्रतिष्ठान यांच्या वतीने मोफत सायकल वाटप करण्यात आले.

ग्रामीण व दुर्गम भागातून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवासाची अडचण भासू नये आणि त्यांचे शिक्षण नियमित सुरू राहावे, या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. डॉ. छाया तांबे यांच्या सहकार्यातून सात, तर स्वर्गीय वैभव दादा प्रतिष्ठानतर्फे तीन अशा एकूण १० सायकलींचे वितरण करण्यात आले. मोनिका गौरव वारे, अंजली जयराम केदार, अलिशा गोरक्षनाथ मोधे, अनुष्का विलास जाधव, नक्षत्रा संतोष खंडागळे, काजल जाधव, कल्याणी तांबे, रुद्र विशाल फापाळे, रुद्राज अशोक केदार आणि स्वरूप तांबे या विद्यार्थ्यांना सायकली देण्यात आल्या. या उपक्रमामुळे दूरवरून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवास सुलभ झाला असून पालक व ग्रामस्थांनी उपक्रमाचे स्वागत केले. "वाहतुकीच्या अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये; शिक्षण हेच प्रगतीचे मूळ आहे," असा संदेश यावेळी देण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने यांनी उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शोभा तांबे यांनी केले, तर प्रकाश मोधे यांनी आभार मानले. स्वर्गीय वैभव दादा यांच्या स्मृती जपत सामाजिक बांधिलकीतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे

## गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई : देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून या शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या सुधारित नियमानुसार, राज्यातील अनुसूचित जातीच्या (नवबौद्धांसह) दरवर्षी १०० विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते. भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या संकेतस्थळावर मान्यता प्राप्त एआयआयएमएस, आयआयएम, आयआयटी, आयआयआयटीस, एनआयटी, आयआयएससी, आयआयएसइआर, इन्स्टीटयूट ऑफ नॅशनल इंपार्टन्स तसेच अन्य नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजनेत संबंधित शैक्षणिक संस्थांच्या शासन निर्णयातील परिशिष्ट 'ब'मध्ये नमूद शाखा व उपशाखांचाही समावेश करण्यात आला आहे. भविष्यात या संस्थांच्या नव्याने सुरू होणाऱ्या शाखा व उपशाखांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. आयआयटी मधील प्रिपरेटरी कोर्स वगळता पूर्णवेळ अभ्यासक्रमांसाठी ही शिष्यवृत्ती लागू राहणार आहे. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी पात्र अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत. अर्जाचा विहित नमुना महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळासह सामाजिक न्याय विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## थकित किमान वेतनाची अंमलबजावणी सुरू

मुंबई : किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत पहिल्या अनुसूचीतील तंबाखू (बिडी निर्माणसह) वस्तुनिर्माणातील अनुसूचित उद्योगातील बिडी कामगारांच्या प्रलंबित किमान वेतन दराचा प्रश्न अखेर पूर्णपणे मार्गी लागला आहे. कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि पुढाकारामुळे बीडी कामगारांच्या थकित किमान वेतनाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्याअनुषंगाने शासनाने बिडी कामगारांच्या सुधारित किमान वेतनाची अंमलबजावणी करण्याचे व फरकाची तसेच थकबाकीची वसुली प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित यंत्रणेला दिले आहेत. बिडी कामगारांच्या प्रलंबित वेतनाबाबत विविध कामगार संघटना आणि मालक संघटनांकडून आलेल्या निवेदनांची गांभीर्याने दखल घेत कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली वेळोवेळी महत्वपूर्ण बैठका पार पडल्या. त्यांनी दोन्ही संघटनांचे म्हणणे सविस्तर ऐकून घेतले व २ जून २०२६ रोजी झालेल्या अंतिम बैठकीत दोन्ही बाजूंच्या प्रतिनिधींना सविस्तर निवेदने सादर करण्याचे निर्देश दिले होते. विविध संघटनांची निवेदने कामगार आयुक्तांमार्फत शासनास प्राप्त झाली.

## प्रत्येक विभागात लोककलांचा महोत्सव करणार

मुंबई : सध्या विविध लोककलांचे महोत्सव सुरु असून यापुढील काळात राज्याच्या सर्व विभागात भव्य स्वरुपात लोककला महोत्सव आयोजित करण्यात येतील, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली. अखिल भारतीय लोककलावंत, मराठी तमाशा परिषद महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा सन्मान सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते रवींद्र नाट्य मंदिरात करण्यात आला, तर मंत्री आशिष शेलार यांचाही लोककलावंताच्या वतीने यावेळी सन्मान करण्यात आला. लोककला अभ्यासक प्रकाश खांडगे यांच्या उपस्थितीत व तमाशा परिषद अध्यक्ष संभाजीराजे जाधव यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला वसंतराव जगताप, खंडूराज गायकवाड, गणेश चंदनशिवे, आविष्कार मुळे, शेषराव गोपाळ, सुनील वाडेकर यांच्यासह राज्यभरातून विविध कला सादर करणारे लोककलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. विठाबाई नारायणगावकर स्मारकाचे काम लवकरात लवकर व्हावे, पेंशन योजना तसेच इतर बाबी तपासण्यासाठी शासनाने एक समिती गठीत करावी, ढोलकी फडाचा तमाशा आणि संगीतबारी याबाबत नियुक्त अभ्यास गटाच्या अहवालानुसार शासन निर्णय काढण्यात यावा व काही जिल्ह्यात तमाशाला पोलिसांकडून परवानगी नाकारली जाते त्याबद्दल पोलिसांना सूचना देण्यात याव्यात.

# भारतीय तिरंगा यात्रा रॅली नसून देशप्रेमाची भावना

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : वरळी सी फेसवर 'राष्ट्र प्रथम तिरंगा उत्सव'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ मुंबई (दै. संध्या)

भारतीय तिरंगा आज आपण हातात घेतला असला तरी तो आपल्या मनामध्ये आहे. भारतीय संविधानाचा सन्मान, देशाचा स्वाभिमान आणि राष्ट्रभावना आपल्या अंतःकरणात आहे. नवभारत घडविण्याची जबाबदारी आता प्रत्येक नागरिकाची आहे. ही जबाबदारी आपण पार पाडली तरच हातातील तिरंग्याला खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त होईल, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. तिरंगा यात्रा ही केवळ एक रॅली नसून देशप्रेमाची भावना जागृत करणारा उपक्रम असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वरळी सी फेस येथे आयोजित करण्यात आलेल्या 'राष्ट्र प्रथम तिरंगा उत्सव' रॅलीचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी तिरंग्याचे महत्त्व अधोरेखित करत देशाच्या विकासाचा आणि नवभारताच्या संकल्पनेचा उल्लेख केला. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, सर्वश्री आमदार रवींद्र चव्हाण, अमित साटम, योगेश सागर, मिहिर कोटेचा, कॅप्टन तमिळ सेल्वन, राजहंस सिंह, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज मला येथे दोन सागर दिसत आहेत. एक म्हणजे समोर असलेला हिंद महासागर आणि दुसरा म्हणजे भारतीय तिरंग्याचा महासागर. ज्या तिरंग्यासाठी क्रांतिकारकांनी बलिदान दिले, सैनिकांनी सीमेवर प्राणांची आहुती दिली आणि देशवासीयांनी स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला, तो तिरंगा जोपर्यंत चंद्र-सूर्य आहेत तोपर्यंत सदैव उंच फडकत राहील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत



जगातील चौथी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनला आहे. विविध क्षेत्रांमध्ये भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान उतरविणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला आहे. अंतराळ संशोधन, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, फिनटेक आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताने मोठी झेप घेतली आहे,असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

भारतामध्ये जगातील दुसरी सर्वात मोठी स्टार्टअप इकोसिस्टम विकसित होत असल्याचे




सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले., भारताकडे सर्वात मोठी युवा शक्ती आहे. तिरंगा हातात घेऊन बाहेर पडणाऱ्या या तरुणाईला थांबवण्याची ताकद जगात कोणाकडेही नाही. भारत एक मोठी महासत्ता म्हणून उदयास येत आहे. भारताची प्रगती काही शक्तींना खटकत आहे. काही परकीय शक्ती भारताची घोडदौड थांबवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र भारताचा विकासाचा प्रवास कोणीही थांबवू शकणार नाही.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाहिलेल्या नवभारताच्या संकल्पनेतून आगामी काळात भारत विकसित राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर अग्रस्थानी दिसेल,असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. या रॅलीसाठी वरळी सी फेस येथे हजारो मुंबईकर एकत्र आले होते.

तिरंगा ध्वज हातात घेतलेले नागरिक, युवक, विद्यार्थी आणि एनसीसी कॅडेट्स यांच्या उत्साहामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला होता. 'भारत माता की जय', 'जय शिवाजी, जय भवानी', 'वंदे मातरम्' अशा घोषणांसह देशभक्तीपर गीतांनी वातावरण दुमदुमून गेले.

# आश्रमशाळेतील सर्पदंशाची घटना अत्यंत गंभीर; दोषींची गय नाही

### मंत्री डॉ. अशोक वुईके : विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष खपवून घेतले जाणार नाही; चौकशीअंती दोषींवर कठोर कारवाई

■ गडचिरोली (दै. संध्या)

धानोरा तालुक्यातील जपतलई येथील अनुदानित आश्रमशाळेत विद्यार्थिनींना सर्पदंश झाल्याची घटना अत्यंत गंभीर आहे. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होत असेल तर ते कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल आणि कोणाचीही गय केली जाणार नाही, असे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी स्पष्ट केले.

जपतलई येथील अनुदानित आश्रमशाळेत घडलेल्या सर्पदंशाच्या दुर्दैवी घटनेची गंभीर दखल घेत डॉ. वुईके म्हणाले, "अनुदानित आश्रमशाळेत अशा प्रकारची घटना घडणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करून एखादी संस्था आश्रमशाळा चालवत असेल, तर अशा निष्काळजीपणाची गंभीर दखल घेतली जाईल. या घटनेत जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. कोणालाही सोडले जाणार नाही."

आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवास आणि सुरक्षिततेची योग्य काळजी घेणे ही संबंधित संस्था व व्यवस्थापनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. या घटनेत कोणत्या स्तरावर त्रुटी अथवा दुर्लक्ष झाले, याची चौकशी करून जबाबदारी निश्चित केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

आश्रमशाळांमध्ये निवासी परिसराची सुरक्षितता, विद्यार्थ्यांची नियमित देखरेख तसेच आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. भविष्यात अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी संबंधित यंत्रणा आणि आश्रमशाळा व्यवस्थापनाने आवश्यक ती दक्षता घ्यावी.

# महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घ्यावे : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ ठाणे (दै. संध्या)

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या दहा वर्षाहून अधिक सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पालिकेच्या सेवेत सामावून घ्यावे असे निर्देश आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले. यासंदर्भात शासनाने नियमानुसार ही पदे भरण्याचे निर्देश त्यांनी नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव डी. गोविंदराज यांना दिले. सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेमध्ये एकूण ११९८ कर्मचारी सेवेत सामावून घेण्याबाबत दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून बैठक घेण्यात आली. यावेळी. या बैठकीला सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार सुहास बाबर, आमदार सुधीर गाडगीळ, नगरविकास अपर मुख्य सचिव डी. गोविंदराज, सांगली कुपवाड मनपाच्या आयुक्त संजिता महापात्र उपस्थित होते.

सांगली मिरज कुपवाड मनपामधील या ११९८ कर्मचाऱ्यापैकी काही कर्मचारी मानधनावर तर काही रोजंदारीवर काम करत आहेत. यातील काही कर्मचारी हे २५ ते ३० वर्षापासून पालिकेच्या सेवेत कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांना आता पालिकेच्या सेवेत सामावून घेण्याची मागणी पालकमंत्री श्री. पाटील, आमदार श्री. बाबर यांनी केली होती.

■ सद्यस्थितीत पालिकेचा आस्थापना खर्च हा एकूण उत्पन्नाच्या ६५.६ टक्के एवढा आहे. अशात या सर्व कर्मचाऱ्यांना पालिकेच्या सेवेत सामावून घेतल्यास पालिकेवर दरमहा अतिरिक्त १० कोटी ४० लाखांचा बोजा पडेल.

■ त्यामुळे सर्वांना सामावून घेतल्यास पालिकेवर पडणारा बोजा टाळण्यासाठी सध्या १० वर्षाहून अधिक काळ सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना तूर्तास पालिकेच्या सेवेत सामावून घ्यावे उर्वरित कर्मचाऱ्यांबाबत नंतर निर्णय घ्यावा, असे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

■ मालमत्ता कर वसूल करावा, त्यात नवीन मालमत्तांचा समावेश करावा असे उपमुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले.

# आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नवीन 'एसओपी' निश्चित करणार

■ गडचिरोली (दै. संध्या)

धानोरा तालुक्यातील जपतलई येथील अनुदानित आश्रमशाळेत घडलेली सर्पदंशाची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आश्रमशाळांमधील विद्यार्थी सुरक्षेचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करण्यात येतील. तसेच आश्रमशाळांसाठी नवीन प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करण्यात येईल, असे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी सांगितले.

जपतलई (ता. धानोरा) येथील अनुदानित आश्रमशाळेच्या वसतिगृहात रात्री सुमारे २ वाजता विद्यार्थिनींना सर्पदंश झाल्याची घटना घडली. या दुर्घटनेत दीपिका इतवा लकडा (वर्ग ६), सुष्मिता सरोजीत मंडल (वर्ग ८) आणि अनु गाजुरं कोरेटी (वर्ग २) या तीन विद्यार्थिनींचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. सर्पदंश झालेल्या अन्य विद्यार्थिनींना तातडीने उपचारासाठी दाखल करण्यात आले. गंभीर प्रकृती असलेल्या दीपीका मडावी या विद्यार्थिनीला प्रशासनाने एअरलिफ्ट सुविधेद्वारे पुढील उपचारासाठी हलवून आवश्यक वैद्यकीय उपचार उपलब्ध करून दिले. सहपालकमंत्री ॲड. जयस्वाल यांनी आज धानोरा येथील शवागृहात मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर जपतलई येथील आश्रमशाळेला भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी आमदार डॉ. मिलिंद नरोटे, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, आदिवासी विकास विभागाच्या अपर आयुक्त आयुषी सिंह आणि जिल्हा पोलीस अधीक्षक एम. रमेश उपस्थित होते.

"आजची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. कुटुंबीयांची भेट आणि घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर काही बाबींमध्ये अधिक जागरूकतेने व जबाबदारीने काम करण्याची आवश्यकता असल्याचे दिसून आले आहे. काही स्तरांवर झालेल्या त्रुटींचा आढावा घेऊन भविष्यात अशी घटना घडू नये, यासाठी प्रत्येकाने आवश्यक दक्षता घेणे गरजेचे आहे," असे ॲड. जयस्वाल यांनी सांगितले.


### कुटुंबीयांना आर्थिक मदत

दुर्घटनेतील मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची शासकीय मदत देण्यात येणार असून, त्यापैकी प्रत्येकी १ लाख रुपयांची तात्काळ मदत सुपूर्द करण्यात आली आहे. उर्वरित मदतीची प्रक्रिया सुरू आहे. याशिवाय मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी अतिरिक्त ५ लाख रुपयांची मदत मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. अन्य शासकीय योजनांमधूनही संबंधित कुटुंबीयांना शक्य ते सर्व आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल, असे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी सांगितले.

# नागरिकांच्या १०० निवेदनांवरील अनुपालनाचा पालकमंत्र्यांनी घेतला आढावा

■ सांगली (दै. संध्या)

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या शासकीय जनसंवाद उपक्रमातून नागरिकांचे प्रलंबित प्रश्न सुटण्यास मदत होत आहे. बहुतांश निवेदनांवर कार्यवाही होऊन प्रश्न मार्गी लागत असल्याने अनुपालन आढावा सभेत अनेकांनी पालकमंत्र्यांचे मनापासून आभार व्यक्त केले आहेत. शासकीय जनसंवाद या उपक्रमांतर्गत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दि. 30 जुलै रोजी झालेल्या पहिल्या सभेत नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या होत्या. या सभेत नागरिकांची जवळपास 100 निवेदने प्राप्त झाली होती. त्यावर गेल्या आठवडाभरात शासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा या अनुपालन सभेत घेण्यात आला. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, शासकीय अधिकाऱ्यांनी प्राप्त प्रत्येक निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन संवेदनशीलतेने काम करावे. लोकाभिमुख, पारदर्शकतेने काम करत नागरिकांचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य द्यावे. नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच मंत्रालय स्तरावरील प्रकरणांचा आपण स्वतः पाठपुरावा करू, अशी ग्वाही यावेळी त्यांनी संबंधितांना दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात झालेल्या या शासकीय जनसंवाद अनुपालन सभेस जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, निवासी उपजिल्हाधिकारी ड़ॉ. स्नेहल कनिचे, उपजिल्हाधिकारी शिवाजी जगताप आणि समाधान शेंडगे, पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. उच्च शिक्षण विभागांतर्गत प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या रजा रोखीकरणबाबतचा वर्षभरापासूनच्या प्रलंबित प्रश्नाबाबत उच्च शिक्षण विभागाने तात्काळ कार्यवाही करून परिपत्रक काढल्याने यावेळी संबंधितांनी पालकमंत्री महोदयांचे सहर्ष आभार मानले.



### उपस्थितांच्या चेहऱ्यावर दिलाशाची भावना

यावेळी जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांनी शेतीची नुकसान भरपाई, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, शेतीला रस्ता मिळणे, महामार्ग, शासकीय नोकरी, अनुकंपा भरती, जमिनीविषयीचे प्रश्न, अतिक्रमण हटवणे, जागेचा कब्जा मिळणे, उपसा सिंचन योजनेचे पाणी, विकासकामासाठी निधी मिळणे, विविध दाखले, सातबारा दुरूस्ती, आर्थिक सहाय्य मिळणे, अनुदान मंजुरी, वर्ग 2 ची जमीन वर्ग 1 करून मिळणे, निवृत्तीवेतन, सिटीसर्व्हे नावनोंदणी, घरपट्टी कमी करणे, शिष्यवृत्ती, कलाकार मानधन, बांधकाम परवाना असे अनेक प्रश्न मांडले. त्यातील बहुंताश प्रकरणे मार्गी लागत असल्याचे बघून उपस्थितांच्या चेहऱ्यावर दिलाशाची भावना दिसत होती.

यावेळी अनेक नागरिकांनी त्यांचे प्रश्न सोडवल्याबद्दल पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे जाहीर आभार व्यक्त केले. प्रत्यक्ष पालकमंत्री आपले गाऱ्हाणे ऐकून घेत आहेत आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबर सर्व विभागांचे अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने अनेक प्रश्नांवर त्वरित कार्यवाही सुरू झाल्याचे निदर्शनास आले. एकूणच लोकाभिमुख पद्धतीने नागरिकांच्या प्रश्नांवर तोडगा निघत असल्याने शासन-प्रशासनाविषयी विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ सक्षम करा

**सासवड : दैनिक संध्या**

■ पुरंदरमधील सकल मराठा समाजाची मागणी

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळासमोरील विविध अडचणी दूर करून हे महामंडळ अधिक गतिमान व सक्षम करावे, या मागणीसाठी मंगळवारी (ता.११) पुरंदर तालुक्यातील सकल मराठा परिवाराच्या वतीने तहसीलदार विक्रम राजपूत यांना निवेदन देण्यात आले. महामंडळाच्या योजनांचा लाभ मराठा समाजातील जास्तीत जास्त युवकांपर्यंत पोहोचावा, यासाठी प्रक्रियेत सुधारणा करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. निवेदनात नमूद केलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये उत्पन्न दाखल्याच्या निकषांमध्ये आवश्यक सुधारणा करून शेतीप्रधान मराठा समाजातील युवकांना कर्ज योजनेचा लाभ सुलभतेने मिळण्याची व्यवस्था करणे, महिला अर्जदारांकडून अनावश्यक कागदपत्रांची मागणी थांबवून कागदपत्र प्रक्रिया सोपी करणे, तसेच 'लेटर ऑफ इंटेंट' नंतर बँकाकडून मागितल्या जाणाऱ्या तारण व जमीनदार अटीबाबत स्पष्ट धोरण जाहीर करून युवकांना योग्य मार्गदर्शन करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, व्याज परतव्यासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करून तो वेळेत मिळण्याची व्यवस्था करावी आणि लाभार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी कार्यक्षम हेल्पलाईन क्रमांक व ईमेल सेवा सुरू करण्यात यावी, असेही निवेदनात म्हटले आहे. आमदार विजय शिवतारे यांच्या कार्यालयातही सदर निवेदन देण्यात आले. याप्रसंगी संदीप जगताप, योगेश कोलते, नंदकुमार जगताप, महादेव पिलाणे, स्वप्निल गायकवाड, अक्षय काकडे यांच्यासह मराठा समाज बांधव उपस्थित होते.

### सासवडमध्ये मतदार यादी विशेष पुनरिक्षण; १७ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**सासवड : दैनिक संध्या**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सासवड शहरामध्ये मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रम राबविण्यात येत आहे. आयोगाच्या सुधारित आदेशानुसार मतदारांनी आगामी १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत आपल्या भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याकडे आवश्यक तो अर्ज भरून देणे बंधनकारक आहे. नगरपरिषद हद्दीतील बीएलओ (BLO) यांनी घरोघरी भेटी देऊन डिजिटल आणि इतर प्रक्रिया पूर्ण केली असून, त्यानुसार अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार (Absent, Shifted, Dead आणि Already Enrolled - ASD) ठरलेल्या मतदारांच्या वर्गवारीनुसार सुधारित याद्या तयार करण्यात आल्या आहेत. ज्या नागरिकांची नावे या विशेष वर्गवारीच्या याद्यांमध्ये समाविष्ट आहेत, त्यांनी तातडीने आपल्या भागातील बीएलओशी संपर्क साधावा. सासवड नगरपरिषदेच्या सासवड नगरपरिषद संकेतस्थळ या अधिकृत संकेतस्थळावर भागनिहाय याद्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शहरातील सर्व नगरसेवक, नगरसेविका आणि सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी या मोहिमेत बीएलओ यांना सहकार्य करावे आणि नागरिकांकडून जास्तीत जास्त अर्ज भरून घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा सासवड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी केले आहे.

### भिवडी विकास सोसायटीचे नाव आता 'आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक'

**सासवड : दैनिक संध्या**

पुरंदर तालुक्यातील भिवडी येथील 'भिवडी विविध कार्यकारी सहकारी संस्था' या संस्थेचे नाव अधिकृतपणे बदलण्यात आले आहे. आता ही संस्था 'आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, भिवडी, ता. पुरंदर, जि. पुणे' या नव्या नावाने ओळखली जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत या नामांतरास अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुरंदर यांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी या नवीन नामांतराचे नोंदणी प्रमाणपत्र जारी केले आहे. संस्थेच्या सर्वसाधारण सभेत झालेल्या ठरावानुसार हा नामांतराचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे भिवडीचे सुपुत्र, स्वातंत्र्यलढ्यातील आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या महान कार्याला अभिवादन करण्यात आले आहे. यापुढे संस्थेचे सर्व प्रशासकीय, बँकिंग तसेच कायदेशीर व्यवहार नवीन नावाने म्हणजेच 'आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, भिवडी' याच नावाने पार पडणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल मोकाशी यांनी दिली आहे.

### बारामतीत आयुष्मान भारत योजनेचा लाभ घेण्याचे नागरिकांना आवाहन

**बारामती : दैनिक संध्या**

एकत्रित आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा बारामती तालुका व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील यांनी केले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती येथे ही योजना कार्यान्वित असून या योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांकडे आधार कार्ड, शिधापत्रिका आणि आयुष्मान कार्ड असणे आवश्यक आहे. आधार कार्ड अद्ययावत असणे गरजेचे असून, शिधापत्रिका १२ अंकी आरसी क्रमांकासह ऑनलाइन असणे आवश्यक आहे. शिधापत्रिकेवर १२ अंकी RC क्रमांक नसल्यास किंवा रुग्णाचे नाव शिधापत्रिकेत नसल्यास, आरोग्य मित्राच्या माध्यमातून तहसीलदारांचा दाखला घेऊन तो तहसील कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर योजनेंतर्गत पात्र रुग्णांना आयुष्मान कार्ड उपलब्ध करून देण्यात येते. या कार्डच्या आधारे नागरिकांना योजनेचा लाभ घेता येतो. नागरिकांनी आधार कार्ड अपडेट करून शिधापत्रिकेचा १२ अंकी क्रमांक अद्ययावत करावा. तसेच गुगल प्ले स्टोअर वरील आयुष्मान ॲप मधील Beneficiary पर्याय किंवा NHA Beneficiary Portal या माध्यमातून आयुष्मान कार्ड स्वतः काढावे अथवा संबंधित रुग्णालयातील आरोग्य मित्राकडूनही आयुष्मान कार्ड मिळवता येईल, असेही श्रीमती पाटील यांनी कळविले आहे.

# शिक्षणाच्या वाटेवर 'सेवेचा हात'

## खळदच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गुणवंतांचा गौरव!

**पर्सिस्टंट फाउंडेशन व स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम**



■ सासवड (दै. संध्या)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देत त्यांच्या गुणवत्तेला आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने खळद येथील श्री. शिवशंभो माध्यमिक विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना पर्सिस्टंट फाउंडेशनच्या वतीने आणि स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या सहकार्याने वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी रीट संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या 'लॅब ऑन व्हिल्स' या विज्ञानविषयक अभिनव उपक्रमांतर्गत आयोजित विज्ञान व्हिडिओ सादरीकरण स्पर्धेतील विद्यार्थ्यांना रीट संस्थेचे विश्वस्त श्रीधर नाळे आणि स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण व्हावी, प्रयोगशीलता वाढावी आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांना शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने 'Lab on Wheels'च्या माध्यमातून विविध विज्ञानविषयक उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग, वैज्ञानिक विचार आणि सर्जनशील मांडणी यांचा अनुभव मिळत आहे.असे मत श्रीधर नाळे यांनी व्यक्त केले. स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने विविध उपक्रम राबविले जात असून, गरजू विद्यार्थ्यांना स्कूल किट, दप्तर, वह्या व अन्य शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्याबरोबरच विविध शाळांना आवश्यक ते सहकार्य केले जात आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आणि आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे येऊ नयेत, यासाठी प्रतिष्ठान सातत्याने कार्यरत आहे.

"विद्यार्थ्यांच्या हातात केवळ वह्या देणे नव्हे, तर त्यांच्या हातात उज्ज्वल भविष्य घडविण्याची संधी देणे हा या उपक्रमामागील उद्देश आहे," अशी भावना संतोष जगताप यांनी यावेळी व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, विज्ञान स्पर्धेतील सहभागाबद्दल मिळालेला सन्मान आणि शैक्षणिक साहित्याची झालेली मदत यामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देणाऱ्या अशा उपक्रमांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. कु. किरण कदम हिने सुत्रसंचलन केले तर मुख्याध्यापक हरीभाऊ टापरे यांनी आभार मानले.

यासोबतच प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजातील गरजू, गरीब, कामगार, शेतमजूर व वंचित घटकांना विविध प्रकारे मदत करण्याचे सामाजिक कार्यही सुरू आहे. शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव या त्रिसूत्रीवर प्रतिष्ठानचे कार्य पुढे जात असून, समाजातील विविध घटकांना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## बारामती परिसरात बुलेट चोरीच्या घटना

### संशयितांचे CCTV फुटेज पोलिसांच्या हाती

■ बारामती (दै. संध्या)

बारामती शहर व परिसरात मागील काही दिवसांत विशेषतः रॉयल एनफिल्ड बुलेट मोटारसायकली चोरीस जाण्याच्या घटना निदर्शनास आल्या असून, नागरिकांनी आपल्या वाहनांच्या सुरक्षिततेबाबत विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन बारामती शहर पोलिसांकडून करण्यात येत आहे. बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत अलीकडील काळात एकूण तीन बुलेट मोटारसायकली चोरीस गेल्या आहेत. तसेच बारामती तालुका पोलीस स्टेशन हद्दीतदेखील तीन बुलेट मोटारसायकली चोरीस गेल्याची माहिती आहे. त्यामुळे बुलेट मोटारसायकलींना लक्ष्य करणारी चोरट्यांची टोळी परिसरात सक्रिय असण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांकडून तपास अधिक तीव्र करण्यात आला आहे. बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. 317/2026, भारतीय न्याय संहिता कलम 303(2) अन्वये दाखल गुन्ह्यात दि. 06/08/2026 रोजी रात्री 10.00 वा. ते दि. 07/08/2026 रोजी सकाळी 10.00 वा. या कालावधीत प्रगतीनगर येथील प्रभावती अपार्टमेंटच्या पार्किंगमधून दोन रॉयल एनफिल्ड मोटारसायकली चोरीस गेल्या आहेत. त्यामध्ये MH-42/AV-2121 क्रमांकाची Classic 350 तसेच MH-42/BK-0749 क्रमांकाची Hunter 350 अशा एकूण अंदाजे रु. 2,60,000/- किमतीच्या मोटारसायकलींचा समावेश आहे. तसेच बारामती शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. 324/2026, भारतीय न्याय संहिता कलम 303(2) अन्वये दाखल गुन्ह्यात दि. 09/08/2026 रोजी रात्री 11.00 वा. ते दि. 10/08/2026 रोजी सकाळी 07.00 वा. या कालावधीत तांदुळवाडी रोड, के-मार्ट पाठीमागील प्रगतीनगर येथील आर्या पॅराडाईस अपार्टमेंटच्या पार्किंगमधून MH-42/BK-9709 क्रमांकाची मेटल ग्रे रंगाची Royal Enfield Classic 350, अंदाजे किंमत रु. 1,10,000/-, चोरीस गेली आहे.

प्राथमिक निरीक्षणानुसार चोरटे अपार्टमेंट, सोसायटी तसेच तुलनेने कमी वर्दळीच्या पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या बुलेट मोटारसायकलींना लक्ष्य करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे केवळ वाहनाचे नियमित हॅण्डल लॉक पुरेसे आहे असे समजू नये.

सदर घटनांच्या अनुषंगाने बारामती शहर पोलिसांनी परिसरातील विविध ठिकाणचे CCTV फुटेज प्राप्त करून त्याचे बारकाईने विश्लेषण सुरू केले आहे. संशयित चोरट्यांच्या हालचालींबाबत महत्त्वपूर्ण माहिती पोलिसांच्या हाती आली असून त्यांचा शोध घेण्यासाठी तपास पथके कार्यरत आहेत. बारामती शहर पोलीस स्टेशनतर्फे सर्व दुचाकी वाहनधारकांना, विशेषतः Royal Enfield Bullet, Classic, Hunter तसेच तत्सम मोटारसायकलधारकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## आंबेगावात तीन गावठी पिस्तुले जप्त; तिघांना अटक

### वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची धडाकेबाज कारवाई

■ पुणे (दै. संध्या)

आंबेगाव परिसरात गावठी अग्निशस्त्र घेऊन फिरणाऱ्या तिघांना आंबेगाव पोलिसांनी सापळा रचून अटक केली. आरोपींकडून तब्बल १ लाख २० हजार ५०० रुपये किमतीची तीन गावठी अग्निशस्त्रे आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईमुळे परिसरातील अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर पोलिसांचा वचक निर्माण झाला आहे.

दिनांक १० ऑगस्ट रोजी आंबेगाव पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, जांभुळवाडी पाझर तलावाशेजारील मोकळ्या जागेत, जांभुळवाडी रोड, शनिनगर, आंबेगाव खुर्द येथे तीन व्यक्ती थांबले असून त्यांच्याकडे अग्निशस्त्रे आहेत. माहिती मिळताच वरिष्ठांच्या आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांनी कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक महेश नायकवडी आणि पोलीस उपनिरीक्षक युवराज शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाने घटनास्थळी सापळा रचला. पोलिसांनी संशयित तिघांना शिताफीने ताब्यात घेत त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे तीन गावठी अग्निशस्त्रे आणि एक जिवंत काडतूस आढळून आले.

पोलिसांनी राजन विनोद शहा, अनिल कैलास चौधरी आणि प्रथम अरुण रेणुसे या तिघांना अटक केली आहे. आरोपींविरुद्ध आंबेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३४१/२०२६ अन्वये भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३(२५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(२)(३) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना न्यायालयाने १४ ऑगस्ट २०२६पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त मिलिंद मोहिते आणि सहायक पोलीस आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) चांगदेव सजगणे, सहायक पोलीस निरीक्षक महेश नायकवडी, पोलीस उपनिरीक्षक युवराज शिंदे आणि त्यांच्या पथकाने केली.

अवैध अग्निशस्त्रांविरोधात आंबेगाव पोलिसांनी सुरू केलेल्या कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तींना मोठा धक्का बसला असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांची कारवाई अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.




अग्निशस्त्रविरोधी कारवाईला वेग देण्यात आला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे जांभुळवाडी परिसरात सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून तीन गावठी अग्निशस्त्रे आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. परिसरात बेकायदा अग्निशस्त्रे बाळगणाऱ्यांवर करडी नजर आहे. अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार आहेत.

**मा. श्री. शरद झिने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक आंबेगाव पोलीस स्टेशन पुणे शहर**

# आदिवासी अस्मिता, संस्कृती आणि एकतेचा जागर

## भिवंडीत जागतिक आदिवासी दिन उत्साहात : 'एक तीर, एक कमान, सब आदिवासी एक समान'च्या जयघोषाने दुमदुमली भिवंडी; तारपा वादन, पारंपरिक नृत्यांनी वेधले नागरिकांचे लक्ष

■ भिवंडी (दै. संध्या)

"एक तीर, एक कमान, सब आदिवासी एक समान", "जल-जंगल-जमीन हमारा नारा है, भारत देश हमारा है" अशा जोशपूर्ण जयघोषाने भिवंडीतील कोंबडपाडा व परिसर रविवारी, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी दुमदुमून गेला. जागतिक आदिवासी दिनानिमित्त कोंबडपाडा व आसपासच्या परिसरातील आदिवासी बांधवांच्या वतीने भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. आदिवासी अस्मिता, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडविणाऱ्या या रॅलीला आदिवासी बांधवांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा, आदिवासी क्रांतिकारक राघोजी भांगरे, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने अभिवादन करण्यात आले.

यानंतर गावदेवी मंदिर येथून रॅलीला सुरुवात झाली. रॅली कोलेकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कोंबडपाडा आणि गाजेंगी हॉल या मार्गाने मार्गक्रमण करत पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आली. तेथे रॅलीचा समारोप करण्यात आला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जागतिक आदिवासी दिनाच्या मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली.



रॅलीमध्ये महिला, युवक-युवती आणि लहान मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पारंपरिक आदिवासी वेशभूषा, तारपा वादन आणि तारपा नृत्य हे रॅलीचे विशेष आकर्षण ठरले. त्याचबरोबर आदिवासी समाजातील मुला-मुलींनी विविध पारंपरिक आदिवासी नृत्यांचे सुंदर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तारपाच्या तालावर थिरकणारे युवक-युवती, महिला आणि चिमुकल्यांमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. रॅलीदरम्यान नागरिकांनी आदिवासी संस्कृती, पारंपरिक वेशभूषा, तारपा वादन आणि विविध आदिवासी नृत्यांचा मनमुराद आनंद घेतला. रॅलीच्या माध्यमातून आदिवासी समाजाची सांस्कृतिक ओळख, सामाजिक एकता आणि आपल्या परंपरांविषयीचा अभिमान प्रभावीपणे व्यक्त झाला. मुख्य कार्यक्रमास आमदार महेश चौगुले, माजी आमदार रुपेश म्हात्रे, आदिवासी सेवक महादेव घाटाळ, शिवसेना नेते प्रसाद भाई पाटील, नगरसेविका रोमा निलेश आळशी, प्रदीप बोडके, नाना झळके, ट्रायबल फोरमचे कोकण विभागीय कार्याध्यक्ष व समितीचे प्रसिद्धी प्रमुख तथा पत्रकार सुनील झळके, शिवसेनेचे गजेंद्र गुळवी, प्रकाश तेलीवरे, विकास बाफना इत्यादी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी जागतिक आदिवासी दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त करून आदिवासी समाजाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या निमित्ताने आदिवासी समाजातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, प्रशासकीय तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करून त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देण्यात आले. यावेळी आर्वी मिलिंद गवे, दिव्यांशी मिलिंद गवे आणि ऋषी कैलास चौधरी यांनी जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व, आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा, इतिहास तसेच आदिवासींचे हक्क याविषयी अत्यंत प्रभावी व अभ्यासपूर्ण भाषणे केली. त्यांच्या मनोगतातून आदिवासी अस्मिता आणि संस्कृतीच्या जतनाचे महत्त्व अधोरेखित झाले. त्यांच्या उत्कृष्ट भाषणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. संपूर्ण कार्यक्रमाचे शामकांत नवाळे सर यांनी अत्यंत प्रभावी व उत्तम सूत्रसंचालन करून कार्यक्रमाची सांगड सुरेखपणे घातली. त्यांच्या सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमाला शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरण लाभले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदिवासी समाज भिवंडी शहर व ग्रामीणचे अध्यक्ष राम मोरघा, उपाध्यक्ष सुनील गुंड, गणेश कोलेकर, शिवदास मांगात, संतोष जाधव, मिलिंद गवे, सुरेश धापसे, अमोल मुकणे, राहुल झळके, वकील निलेश नाकोडे, वकील मनोहर उतळे यांच्यासह पदाधिकारी व आदिवासी समाजातील तरुण कार्यकर्ते यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी आयोजकांच्या वतीने उपस्थित आदिवासी बांधव-भगिनी, नागरिक, मान्यवर तसेच रॅलीसाठी विशेष सहकार्य करणारे निजामपुरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व सर्व पोलीस कर्मचारी यांचे आभार मानण्यात आले.

आदिवासी संस्कृतीचे जतन, सामाजिक एकता, हक्क-अधिकारांविषयी जागृती आणि नव्या पिढीला आपल्या इतिहासाची व परंपरेची ओळख करून देणारा हा जागतिक आदिवासी दिनाचा सोहळा भिवंडीत उत्साहपूर्ण आणि जल्लोषमय वातावरणात संपन्न झाला.